सोमवार, १४ मार्च २०२२
# राम प्रहर
◆ वर्ष १४ ◆ अंक २३६
www.ramprahar.com
◆ पाने ६ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## अंतरंग

मविआ सरकारने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली -तुपकर/३
आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते विकासकामांचा शुभारंभ/५
श्रीलंकेविरुद्ध कसोटीत पंतचे जलद अर्धशतक/६

## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी घेतली उच्चस्तरीय बैठक



**नवी दिल्ली :** युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदींनी रविवारी (दि. १३) भारताच्या सुरक्षा सज्जतेबाबत उच्चस्तरीय बैठक घेतली. रशियाने युक्रेनवर हल्ला केल्यापासून पंतप्रधान मोदींनी केंद्रीय मंत्री आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत अनेक उच्चस्तरीय बैठका घेतल्या आहेत. केंद्रीय सुरक्षा समितीची ही बैठक होती. या बैठकीत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, अर्थमंत्री निर्मला सीतारामन, परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर, परराष्ट्र सचिव हर्षवर्धन श्रृंगला आणि राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल उपस्थित होते. युक्रेनमध्ये सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर बोलावलेल्या या बैठकीत भारताची सुरक्षा सज्जता आणि सध्याचे जागतिक वातावरण यावर चर्चा करण्यात आली. खारकिव्हमध्ये मृत्यू झालेल्या नवीन शेखरप्पा या विद्यार्थ्याचा मृतदेह परत आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे निर्देश पंतप्रधान मोदींनी या वेळी दिले.

# सरकारचे घोटाळे उघड केल्यामुळेच मला नोटीस



### विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांचा आरोप

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्याच्या गृहविभागातील बदल्यांबाबतचा अहवाल उघड झाल्याच्या प्रकरणात रविवारी (दि. १३) पोलिसांनी विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या घरी जाऊन त्यांचा जवाब नोंदविला. याचा भाजपकडून तीव्र निषेध करण्यात येत असून फडणवीस यांना आलेल्या नोटीसची राज्यभर होळी करण्यात आली, तर जवाब दिल्यानंतर फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेत आपण अधिवेशनात सरकारचे घोटाळे उघड केल्यामुळेच आपल्याला पोलिसांची नोटीस पाठवण्यात आल्याचा गंभीर आरोप केला.

फडणवीस म्हणाले, राज्यात बदल्यांचा जो महाघोटाळा झाला त्याची सगळी माहिती मी केंद्रीय गृहसचिवांपर्यंत पोहचवली. त्यानंतर उच्च न्यायालयाने या घोटाळ्याची चौकशी सीबीआयला सोपवली. त्यावर सर्वोच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले. याचाच अर्थ हा महाघोटाळा घडला. हा घोटाळा का घडला याची चौकशी हे सरकार यासाठी करू शकत नाही, कारण महाघोटाळ्याचा अहवाल सहा महिने सरकारने दाबून ठेवला. मी जर तो बाहेर काढला नसता, तर कोट्यवधींचा घोटाळा दबून गेला असता.

दाऊदसोबत सरकारच्या मंत्र्यांचे कनेक्शन किंवा विरोधी पक्षाबाबत सरकार करीत असलेले षडयंत्र हे विषय मी अधिवेशनादरम्यान सभागृहात मांडले. म्हणून अचानक अशी नोटीस मला देण्यात आली, असेही फडणवीस यांनी म्हटले. (पान २ वर..)

### पोलिसांच्या प्रश्नांवर आक्षेप

*या वेळी बोलताना विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी पोलिसांनी त्यांना विचारलेल्या प्रश्नांवर आक्षेप नोंदवला. मला जी प्रश्नावली पाठवली होती आणि आज मला विचारण्यात आलेले प्रश्न यात गुणात्मक अंतर आहे. आजच्या सगळ्या प्रश्नांचा रोख गोपनीयता कायद्याचे उल्लंघन मीच केलेय असा होता. म्हणजे हा घोटाळा काढून या कायद्याचे उल्लंघन तुम्ही केलेय असे तुम्हाला वाटत नाही का? हे योग्य होते का? हे साक्षीदाराचा जबाब घेण्यासारखे प्रश्न नव्हते, पण पोलिसांचे प्रश्न मला सहआरोपी करता येईल का असे होते, अशा शब्दांत फडणवीस यांनी आक्षेप नोंदविला.*

## विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना पाठविलेल्या पोलीस नोटीसची पनवेलमध्ये भाजपकडून होळी

# मविआ सरकारचा तीव्र निषेध



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील एक एक घोटाळे बाहेर काढत असल्याने महाविकास आघाडी सरकारने गुन्हेगारांवर कारवाई करणे अपेक्षित असताना उलट फडणवीस यांनाच सरकारने पोलिसांमार्फत नोटीस पाठवली. हा सर्व प्रकार बघता महाराष्ट्रातील जनता संतापली असून या नोटीसची रविवारी (दि. १३) खांदा कॉलनी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली होळी करून महाविकास आघाडी सरकारचा निषेध करण्यात आला.

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी मार्च २०२१मध्ये एक पत्रकार परिषत घेऊन मविआ सरकारचा गृहखात्यातील बदल्यांचा महाघोटाळा बाहेर काढला होता तसेच त्याचे पेन ड्राईव्ह, सर्व पुरावे त्यांनी त्याच दिवशी दिल्लीला जाऊन देशाच्या गृह सचिवांकडे सादर केले. या बदल्या घोटाळ्याची चौकशी सीबीआय करीत आहे. असे असताना झालेला घोटाळा दाबण्यासाठी फडणवीस यांनाच पोलिसांकडून नोटीस पाठविण्यात आली. त्यामुळे भाजप आक्रमक झाला असून प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी निर्देशित केल्यानुसार राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात पोलीस नोटिसीची रविवारी होळी करण्यात आली.

खांदा कॉलनीतही नोटिसीची जाहीर होळी केली गेली. या वेळी भाजप प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, युवा मोर्चा प्रदेशाध्यक्ष व नगरसेवक विक्रांत पाटील, पनवेल महापालिकेच्या उपमहापौर सीताताई पाटील, भाजप पनवेल शहर अध्यक्ष जयंत पगडे, महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, नगरसेवक अनिल भगत, नितीन पाटील, मनोहर म्हात्रे, एकनाथ गायकवाड, नगरसेविका चारुशीला घरत, हेमलता म्हात्रे, भाजप पनवेल शहर सरचिटणीस अमरीश मोकल, गोपीनाथ मुंडे, संजय जैन, श्रीनिवास कोडरू, मोतीलाल कोळी, भीमराव पोवार, महिला मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष राखी पिंपळे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी महाविकास आघाडी सरकारच्या कारभाराचा जोरदार घोषणा देऊन तीव्र निषेध केला.

# महाडमध्ये बँकेत बनावट सोने ठेवून लाखोंचा अपहार

**महाड : प्रतिनिधी**

सोनाराशी संगनमत करून आरोपींनी महाड येथील कर्नल आर. डी. निकम सैनिक सहकारी बँकेत बनावट सोने ठेवून घेतलेल्या कर्जापैकी १७ लाख ४५ हजारांचा अपहार केला. या प्रकरणी १८ जणांविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. महाडमधील अनेक बँकांमध्ये अशा प्रकारचे अपहार झाले असून प्रतिष्ठित लोक यांत गुंतल्याची चर्चा आहे.

**१८ जणांवर गुन्हा दाखल**

महाडमधील कॅ. आर. डी. निकम सैनिक सहकारी बँकेत ३१ डिसेंबर २०२१ रोजी झालेल्या सोने तपासणीत सराफ सुधाकर सागवेकर याच्याशी संगनमताने काही लोकांनी मिळून बनावट सोने ठेवून कर्ज उकळल्याचे निष्पन्न झाले. यामध्ये बँकेने १७ लाख ४५ हजार ९१ रुपयांचा अपहार झाल्याप्रकरणी १२ मार्च रोजी तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार आरोपी सुधाकर विठोबा सागवेकर, ऋतुजा राजेंद्र जाधव, राजेंद्र किसन जाधव, रंजित हरिश्चंद्र जाधव, रेवती रंजित जाधव, संजना समीर निगडेकर, संध्या संजय टेंभे, प्राची महेश आर्ते, सुशिला लक्ष्मण भिंगारे, वैभव बंडू धर्माधिकारी, महेश तुकाराम घरटकर, दर्शन रवींद्र पवार, अशोक सोनू नगरकर, शिल्पा अशोक नगरकर, अक्षय मंगेश बामने, जतिन मनोहर पवार, श्वेता श्रीरंग पालांडे, भूपेंद्र विठोबा पवार यांच्याविरोधात महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहे.

## दुसरा व्हिडीओ बॉम्ब उद्या-परवा येतोय : चंद्रकांत पाटील

**मुंबई : प्रतिनिधी**

विरोधकांविरोधात खोटे गुन्हे रचून त्यांना अडकवण्याचा डाव सत्ताधाऱ्यांकडून रचला जातोय, असा गंभीर आरोप विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी केलाय. हा आरोप करताना त्यांनी विधानसभा अध्यक्षांना वेगवेगळ्या व्हिडीओ फुटेजने भरलेला पेन ड्राईव्ह दिला. त्यानंतर आता भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी मोठे विधान केले आहे.

उद्या किंवा परवा आणखी एक व्हिडीओ बॉम्ब येणार असल्याचे भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी म्हटले आहे तसेच हा व्हिडीओ पहिल्यापेक्षाही स्ट्राँग असल्याचेही ते म्हणाले. टीव्ही ९ मराठीने याबाबतचे वृत्त प्रसारित केले आहे. देवेंद्र फडणवीस यांनी एक व्हिडीओ बॉम्ब टाकला. एका व्हिडीओ बॉम्बमुळे सगळे चिडीचूप झालेत. दुसरा व्हिडीओ उद्या-परवा येतोय. दुसरा व्हिडीओ तर खूपच स्ट्राँग आहे. फडणवीस यांच्या पाठीमागे पूर्ण भाजप तसेच जनता आहे, असेही पाटील म्हणाले.

# शेकापचे गजानन पाटील असंख्य समर्थकांसह भाजपमध्ये दाखल

### मान्यवरांकडून स्वागत



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील आणि उरण विधानसभा मतदारसंघात समाविष्ट असलेल्या दापोली येथील शेतकरी कामगार पक्षाचे माजी उपसरपंच गजानन तुळशीराम पाटील आणि त्यांच्या शेकडो सहकाऱ्यांनी रविवारी (दि. १३) भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी व अन्य मान्यवरांनी स्वागत केले.

खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात झालेल्या या पक्षप्रवेश सोहळ्याला भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष के. ए. म्हात्रे, पं. स. सदस्य रेखा म्हात्रे, माजी सदस्य सुभाषशेठ म्हात्रे, सुजाता जितेकर, कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर, पाटणोलीचे माजी सरपंच प्रकाश पाटील, दापोलीचे माजी सरपंच गोवर्धन डाऊर, पारगाव ग्रामपंचायतीच्या सदस्य कल्पना तारेकर, उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष राकेश गायकवाड, सुनीलशेठ म्हात्रे, विहान जितेकर, समीर केणी, मंगेश शेलार आदी उपस्थित होते.

या वेळी शेकापचे गजानन पाटील, राजकुमार जितेकर, राहुल पाटील, दशरथ पाटील, जितेंद्र जितेकर, भरत कुडावकर, अरुण तारेकर, सावळाराम पाटील, चिंतामण घोपरकर, रवींद्र पाटील, समीर पाटील, शिवतेज जितेकर, प्रतिश पाटील, विक्रांत जितेकर, एकनाथ जितेकर, प्रफुल्ल जितेकर, प्रितम जितेकर, प्रतिश जितेकर, केतन जितेकर, विपुल जितेकर, ओमकार कुडावकर, रॉबिन कुडावकर, राम जितेकर, लक्ष्मण जितेकर, शेखर पाटील, साई पाटील, सागर पाटील, साजन घरत, प्रथमेश घरत, सयंम जितेकर, विनीत घरत, अवी जितेकर, पराग पाटील, निरज पाटील, माणिक पाटील, चंद्रकांत देशमुख, मेघनाथ म्हात्रे, प्रथमेश म्हात्रे, नितीन म्हात्रे, विशाल पवार, हरिभाऊ पवार, दिलीप पवार, तुषार पवार, सत्यवान पाटील, हर्षद जितेकर, कैलास पाटील, प्रसाद पवार, परेश फडके, गणेश पाटील, अल्पेश हजारे, पवन जितेकर, सुमित जितेकर, प्रदीप जितेकर, कुंदन जितेकर, मनीषा पाटील, सोनाली पाटील, धनश्री पाटील, सुषमा जितेकर, अरुणा जितेकर, लता जितेकर, सरिता जितेकर, आशा जितेकर, रत्ना जितेकर, सरिता पाटील, स्वप्नाली जितेकर, रिया जितेकर, प्रणाली जितेकर, मनाली पाटील, बेबी म्हात्रे, अलका म्हात्रे, हर्षदा म्हात्रे, संगीता म्हात्रे, विजया पवार, भूमिता फडके, रूपाली भोईर, स्नेहल पाटील यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. त्यांचे मान्यवरांनी स्वागत केले.

# काँग्रेसच्या बैठकीत दारुण पराभवाचे आत्मचिंतन

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पाच राज्यांमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर काँग्रेस कार्यकारिणीची बैठक रविवारी (दि. १३) झाली. या वेळी पक्षाच्या सातत्याने ढासळत असलेल्या कामगिरीवर आत्मचिंतन करण्यात आले.

काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीस राहुल गांधी, प्रियांका गांधी-वाड्रा, हरिश रावत, मल्लिकार्जुन खर्गे, अंबिका सोनी यांच्यासह अन्य नेते उपस्थित होते. या बैठकीदरम्यान एका गटाकडून राहुल गांधी यांना पुन्हा अध्यक्ष करण्याचा सूर आळविण्यात आला.

तत्पूर्वी, काँग्रेस संसदीय रणनीती दलाच्या बैठकीत पक्षाच्या 'जी २३' गटाच्या नेत्यांनी मुकुल वासनिक यांना पुढील काँग्रेस अध्यक्ष म्हणून सुचवले, मात्र ही सूचना काँग्रेसच्या संसदीय समितीने मान्य करण्यास नकार दिला, असे सूत्रांनी सांगितल्याचे एएनआयने म्हटले आहे.

## निवडक

### आफ्रिकेत भीषण रेल्वे अपघात; ६१ जणांचा मृत्यू, ५२ जखमी

**किन्शासा :** आफ्रिकन देश कांगोमध्ये रेल्वेचा भीषण अपघात झाला असून यामध्ये तब्बल ६१ लोकांचा मृत्यू, तर ५२ लोक जखमी झाले आहेत. रूळावरून रेल्वेगाडी घसरल्यामुळे ही दुर्दैवी घटना घडली असून जगभरातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान, जखमींपैकी काहींची प्रकृती गंभीर असल्यामुळे मृतांचा आकडा वाढण्याची शक्यता आहे.

### अंबाबाई, जोतिबाचे आता थेट दर्शन; ई-पासची सक्ती नाही

**कोल्हापूर :** राज्यभरातील भाविकांसाठी एक खूशखबर आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने जवळपास सगळ्याच गोष्टी नॉर्मल मोडवर आल्या आहेत. त्यामुळे आता प्रसिद्ध देवस्थानांनी ई-पासची सक्ती रद्द करीत भक्तांना थेट देवाचे दर्शन घेण्याची मुभा दिली आहे. कोल्हापूरची करवीर निवासिनी अंबाबाई आणि जोतिबाच्या दर्शनासाठी आता ई-पासची गरज लागणार नाही.

# 'संतांची मांदियाळी' नाट्यप्रयोग सादर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक महिला दिनानिमित्त श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व भारतीय जनता पक्ष महिला मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने आणि नाच गं घुमा पनवेल प्रस्तुत 'संतांची मांदियाळी' हा नाट्यप्रयोग शनिवारी (दि. १२) आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सादर झाला. विशेष म्हणजे या नाटकात महिलांनी सर्व भूमिका साकारल्या.

या नाटकाच्या लेखिका सुनिता खरे असून दिग्दर्शक शरद दातार आहेत. नाट्यप्रयोगावेळी भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, पं. स. सदस्य तथा महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत, शहर अध्यक्ष वर्षा नाईक, नगरसेविका चारुशीला घरत, दर्शना भोईर तसेच वर्षा प्रशांत ठाकूर, अर्चना परेश ठाकूर, सुप्रसिद्ध नाट्यनिर्मात्या कल्पना कोठारी, माजी नगरसेविका निता माळी आदी उपस्थित होते.

### महिलांनी साकारल्या सर्व भूमिका





# पनवेलकरांना ऑनलाइन मालमत्ता उतारा मिळणार विनाशुल्क

**पनवेल : प्रतिनिधी**

महापालिकेच्या मालमत्ता कर विभागासाठी नव्याने विकसित केलेल्या संगणक प्रणालीद्वारे काढण्यात येणारा ऑनलाइन मालमत्ता उतारा हा आता पनवेलकरांना विनाशुल्क मिळणार आहे. स्थायी समितीने या विषयास मंजुरी दिली आहे.

ऑनलाइन मालमत्ता उतारा विनाशुल्क मिळावा अशी नागरिकांची वारंवार मागणी होत असल्याने महापालिकेने हा उतारा विनाशुल्क देण्याचा निर्णय घेतला आहे, मात्र मालमत्ताधारकांनी प्रत्यक्ष मालमत्ता विभागातून मालमत्ता उतारा घेतल्यास त्यांना विहीत केलेली प्रती उतारा १०० रुपये फी द्यावी लागणार आहे तसेच ऑनलाइन उतारा घेण्यासाठी मालमत्ताधारकांनी आपला संपूर्ण मालमत्ता कर भरणा करणे आवश्यक असून त्यानंतरच वेबसाइटवरून विनाशुल्क उतारा डाऊनलोड करता येईल. (पान २ वर..)




### 'मनपा आपल्या दारी'

*नागरिकांना मालमत्ताकरासंदर्भात माहितीसाठी वारंवार महापालिकेत ये जा करावी लागू नये यासाठी पालिकेने ४० टॅब आपल्या कर्मचाऱ्यांना दिले आहेत. या टॅबच्या माध्यमातून कर्मचारी घरोघरी जाऊन मालमत्ता कराचे बिल, टॅक्सची माहिती, उतारा, मालमत्तेविषयीची माहिती देत आहेत. यासाठी 'क्लार्क ईपीके' सॉफ्टवेअर पालिकेने विकसित केले आहे.*

# राज्य सरकारमध्ये दिवसरात्र तमाशा

## भाजप प्रवक्ते केशव उपाध्ये यांचे टीकास्त्र

**मुंबई : प्रतिनिधी**




केंद्रीय तपास यंत्रणांच्या कारवाईवरुन विरोधक सातत्याने केंद्र सरकारवर टीका करत असतात. दरम्यान, रविवारी विधानसभेचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना मुंबई पोलिसांनी चौकशीसाठी नोटीस पाठवली. यानंतर भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले आणि राज्यातील विविध ठिकाणी आंदोलन सुरू केले. यावरून संजय राऊतांनी भाजपवर टीका केली होती, त्यांच्या टीकेला भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी राज्य सरकारमध्ये दिवसरात्र तमाशा सुरू असल्याचे प्रत्युत्तर दिले आहे.

संजय राऊत यांच्या ट्वीटला उत्तर देताना केशव उपाध्ये म्हणतात, खरोखरच कमाल आहे. पहा ना मंत्रालयात, विधान भवनात मुख्यमंत्री जातच नाहीत. तुम्ही स्वता कोणताही पुरावा हातात नसताना शिवसैनिकांची गर्दी करत वाट्टेल ते आरोप करण्याची प्रेस घेता. महाराष्ट्रातील सरकारमध्ये दिवसरात्र तमाशा सुरू आहे. लोकशाहीत सगळे समान तर ही विशेष वागणूक कशाला? असे उपाध्ये म्हणाले.

दुसऱ्या एका ट्वीटमध्ये उपाध्ये म्हणतात की, 'महावसुली आघाडी सरकारने पोलिसांचा गैरवापर करीत विरोधकांना संपविण्याचा प्रयत्न केला, तरी ना जनता शांत बसणार ना देवेंद्रजी भ्रष्टाचार काढण्याच थांबणार. या ट्विटसोबत त्यांनी आय सपोर्ट देवेंद्र असा हॅशटॅगही वापरला.

## मविआ सरकार कौरवांचेही बाप; सुधीर मुनगंटीवार यांचा घणाघात

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस हे ठाकरे सरकारमधील घोटाळे बाहेर काढत असल्याने अस्वस्थ झालेले सरकार सुडबुद्धीने फडणवीसांनाच नोटीस पाठवित आहे. त्यामुळे भाजप कार्यकर्ते आक्रमक झाले असून त्यांनी फडणवीसांना आलेल्या नोटीसचा निषेध करून राज्य सरकारवर टीका केली आहे. भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी मविआ सरकार कौरवांचेही बाप असल्याची टीका केली आहे.

चंद्रपूर येथे प्रसार माध्यमांशी ते बोलत होते. या वेळी ते म्हणाले की, ज्या देवेंद्र फडणवीस यांनी घोटाळा बाहेर काढला त्यांना चौकशीच्या फेऱ्यात अडकवणे म्हणजे कट-कपट, कारस्थान यांचा उगम आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वर्षात घोटाळेबाजांना उघडे करणाऱ्या फडणवीस यांच्यासारख्या विरोधी नेत्यांना दिली जाणारी वागणूक संतापजनक आहे.

हे सरकार इंग्रजांनाही लाजवेल अशा पद्धतीने वागत असल्याचा घणाघातही सुधीर मुनगंटीवार यांनी ठाकरे सरकारवर केला आहे.

## देवेंद्र फडणवीसांना आलेल्या नोटीसचा नवी मुंबईतही निषेध

**नवी मुंबई : बातमीदार**




भाजपचे नेते, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्रान्स्फर घोटाळ्याची चौकशी व्हावी म्हणून आवाज उठवला, मात्र यातील दोषीवर कार्यवाही न करता उलटपक्षी राज्यातील सत्ताधाऱ्यांनी सत्येचा दुरूपयोग करीत सूडबुद्धीने फडणवीस यांच्यावर नोटीस बजावून त्रास देणे सुरू केले आहे. याचा निषेध करीत नवी मुंबईतील भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. देवेंद्र फडणवीस तुम संघर्ष करो हम तुम्हारे साथ है अशा घोषणा देत त्यांना जोरदार पाठिंबा दिला.

वाशी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात करण्यात आलेल्या निषेध आंदोलनाचे नेतृत्व भाजप नवी मुंबई जिल्हा अध्यक्ष डॉ. रामचंद्र घरत यांनी केले. या वेळी संतप्त भाजप कार्यकर्त्यांनी नोटीस फाडून आपला जाहीर निषेध व्यक्त केला. डॉ. रामचंद्र घरत म्हणाले की, माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पोलिसांनी बजावलेली नोटीस म्हणजे एक राजकीय षड्यंत्र आहे. फडणवीस यांनी प्रत्येक वेळी महाविकास आघाडीचा भ्रष्टाचार चव्हाट्यावर आणला आहे. आघाडीच्या या कारवाईचा आम्ही निषेध करित आहोत.

या वेळी माजी महापौर जयवंत सुतार, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष दत्ता घंगाळे, नवी मुंबई युवती मोर्चा अध्यक्ष सुहासिनी नायडू,महामंत्री कृष्णा पाटील, माजी नगरसेवक रवींद्र इथापे, उषा भोईर, माधुरी सुतार, अशोक गुरखे यासह कार्यकर्ते उपस्थित होते. या वेळी देवेंद्र फडणवीस यांच्या समर्थनार्थ जोरदार घोषणा देण्यात आल्या.



## केएलई सोसायटीची नेरूळमध्ये नवीन शाळा

### आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते पायाभरणी सोहळा

**नवी मुंबई : बातमीदार**

के. एल. ई सोसायटीच्या नवीन शाळेचा पायाभरणी समारंभ प्रमुख बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते नुकताच नेरूळ येथे झाला.

या वेळी के.एल.ई सोसायटीचे प्रेसिडेंट व बेळगाव कर्नाटकचे आमदार महंतेश कौजलगी, अध्यक्ष डॉ. प्रभाकर कोरे, नवी मुंबईचे माजी उपमहापौर शशिकांत बिराजदार तसेच सोसायटीच्या संचालक मंडळाचे इतर सभासददेखील उपस्थित होते. के. एल. ई सोसायटीचे अध्यक्ष डॉ. प्रभाकर कोरे यांच्या हस्ते आमदार मंदा म्हात्रे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

शरण संकुल चॅरिटेबल सोसायटीतर्फे के.एल.ई सोसायटीचे अध्यक्ष डॉ. प्रभाकर कोरे व इतर मान्यवर सभासदांचा सत्कार करण्यात आला.

नवी मुंबई शहर हे एक मिनी भारत म्हणून ओळखले जाते. या शहरात अनेक राज्यांचे नागरिक वास्तव्यास आहेत. अनेक राज्यांची भवने, अनेक राज्यांच्या संस्थांच्या शाळा नवी मुंबईत आहेत. के.एल.ई संस्थेची नेरुळ येथील ही शाळा येणाऱ्या काळात नवी मुंबई शहरातील उच्च दर्जाचे शिक्षण देणारी एक प्रमुख स्त्रोत ठरेल अशी इच्छा या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांनी व्यक्त करून शाळेला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कळंबोलीत हळदीकुंकू कार्यक्रम; आमदार प्रशांत ठाकूर यांची उपस्थिती

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**




कळंबोली येथील ज्ञानमंदिर विद्यालय येथे शनिवारी (दि. १२) नगरसेवक अमर पाटील यांच्या वतीने सार्वजनिक हळदीकुंकू कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

नगरसेवक अमर पाटील यांनी येथील जनतेची सेवा करताना अनेक विकासाची, जनहिताची कामे केली आहेत. याचीच पावती म्हणून आज हा मोठा समुदाय उसळला आहे. मोदीजींनी अनेक योजना आणल्या आणि त्या जनतेपर्यंत पोहचविल्या. त्यामुळे जनतेने मोदीजी व भाजपवर विश्वास टाकत पाच राज्याच्या निवडणुकीत चार राज्यात भाजपला घवघवीत यश मिळवून दिले. आणि तेच सातत्य राखीत आम्ही जनतेची सेवा करत राहू, असा विश्वास आमदार प्रशांत ठाकूर यांनी या वेळी व्यक्त केला.

सार्वजनिक हळदीकुंकू कार्यक्रमात महिलांसाठी खेळ पैठणीचा या विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात मोठ्या संख्येने महिलांनी भाग घेतला होता. विजेत्या महिलांना आमदार प्रशांत ठाकूर, महापौर डॉ. कविता चौतमोल, नगरसेविका दर्शना भोईर, सभापती प्रमिला पाटील, नगरसेविका मोनिका महानवर, नगरसेवक बबन मुकादम यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

या कार्यक्रमाला प्रिया मुकादम, बबन बारगजे, विलास कुठे, संदीप भगत, अमर ठाकूर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाचा लाभ कळंबोली व परिसरातील महिलांना घेता यावा म्हणून रिक्षातून स्पीकरद्वारे या कार्यक्रमात भाग घेण्याचे आवाहन करण्यात आले होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंडल उपाध्यक्ष प्रियंका पवार, कळंबोली महिला मोर्चा अध्यक्ष मनीषा निकम, महिला मोर्चा सरचिटणीस दुर्गा सहानी, उमा राव, कविता गुज्जर, मयूरी पेरवी, श्वेता नगराले, नीता अधिकारी, सरिता बसोने, आश अल्लाह, सुलभा साखरे, पुष्पा पंचाक्षरी आदींनी परिश्रम घेतले.

## उरण पोलिसांतर्फे गरजूंना अन्नदान

**उरण : प्रतिनिधी, बातमीदार**



सुफल आहाराच्या माध्यमातून उरण चारफाटा येथील झोपडपट्टीतील गोरगरीब, गरजू मुलांना दररोज एकवेळचे दुपारचे जेवण मोफत दिले जाते. सामाजिक बांधिलकी जपत कोरोना काळात महिला सामाजिक कार्यकर्त्या सारिका पाटील यांनी व त्यांच्या टीमने सुफल आहाराच्या माध्यमातून मोफत अन्नदान सुरू केले. ते आजही अखंडपणे सुरू आहे.

अनेक दानशूर व्यक्ती या उपक्रमाला मदत करीत असतात. तर अनेक व्यक्ती आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधून तर काही व्यक्ती विविध सणांचे औचित्य साधून चारफाटा येथे सुफल आहाराच्या माध्यमातून अन्नदान करीत असतात. अशाच प्रकारे सामाजिक बांधिलकी जपत उरणमधील पोलीस बांधवांनी आपल्या स्व: खर्चातून झोपडपट्टी येथील मुलांना मोफत अन्नदान केले.

सहाय्यक पोलीस निरीक्षक अनिरुद्ध गिजे, नाईक धीरज पाटील, युवराज जाधव, कातकर यांनी सामाजिक बांधिलकी जपत अन्नदान केले. त्यांच्या या कार्याचे सर्वत्र कौतुक होत असून अशा पोलीस बांधवांचा आदर्श सर्वांनी घ्यावा, असे मत उरणमधील नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## दुखवटा

### अजित शहा



**अलिबाग :** अलिबाग अर्बन बँकेचे माजी अध्यक्ष तथा कोकण एज्युकेशन सोसायटीचे माजी कार्यवाह अजित पुरुषोत्तम शहा (वय ६९) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, पुत्र, भाऊ असा परिवार आहे. अजित शहा हे अलिबाग अर्बन बँकेचे अनेक वर्ष संचालक तसेच अध्यक्ष म्हणून कार्यरत होते. त्यांनी जनता शिक्षण मंडळाचे माजी सेक्रेटरी, कोकण एजुकेशन सोसायटीचे कार्यवाह आदी महत्वाच्या पदांवर काम पाहिले होते.

## डॉ. देवळेकर यांचा सन्मान

**मुंबई : प्रतिनिधी**



डॉ. अफजल देवळेकर सरकार यांना त्यांच्या सामाजिक कार्याची दखल घेत राज्यपाल भगत सिंह कोश्यारी यांच्या हस्ते समितीच्या समाजरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार राजभवन येथे सोमवारी (दि. ७) पार पडलेल्या सोहळ्यात त्यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. अफजल यांनी सरकार एंटरप्राइजेस रिअल इस्टेट कन्सल्टन्सी सांभाळत २०११ साली राजकारण व समाजकारणात सक्रिय झाले व शाहुवाडी पन्हाळा विधानसभा २०१९ची निवडणूक लढवली तसेच पनवेल महानगरपालिका २०१७ नगरसेवक पद लढवले. त्यांनी अनेक संस्थावर पदांच्या माध्यमातून सामाजिक व राजकिय कार्य केले आहे. त्यांना अनेक पुरस्कार व पद देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## शिवकालीन शस्त्र आणि नाणी प्रदर्शन

**उरण :** तिथीनुसार येणाऱ्या शिवजयंतीनिमित्त उरणमध्ये प्रथमच मी उरणकर सामाजिक व सांस्कृतिक प्रतिष्ठानतर्फे शिवकालीन पर्वातील प्रत्यक्ष लढाईत वापरण्यात आलेले शस्त्र व पेशवाई काळातील नाणी यांचे प्रदर्शन ठेवण्यात आले आहे. सोमवारी (दि. २१) तेरापंथी हॉल येथे सकाळी १० ते रात्री ८ वाजेपर्यंत हे प्रदर्शन आहे. सर्वांनी याचा लाभ घ्यावा, असे संस्थेचे संस्थापक अध्यक्ष विशाल विजय पाटेकर यांनी केले आहे.

पान १ वरून

## सरकारचे घोटाळे उघड केल्यामुळेच मला नोटीस

आपण जे केले ते गोपनीयता कायद्याचे उल्लंघन असेल, तर पहिली कारवाई नवाब मलिक यांच्यावरच व्हायला हवी. मी जबाबदार नेत्यासारखा वागलो. ट्रान्स्क्रिप्ट किंवा पेन ड्राईव्ह मी अन्य कुणालाही दिला नाही. राज्य सरकारनेच जो घोटाळा दाबला त्याचे कागदपत्र मी राज्य सरकारला दिले असते तर त्यांनी काय दिवे लावले असते. त्यामुळे मी हे कागदपत्र केंद्रीय गृहसचिवांना दिले. संवेदनशील माहिती मी सार्वजनिक केली नाही. गोपनीयतेचा भंग कुणी केला? संध्याकाळी ही सगळी कागदपत्रे नवाब मलिकांनी पत्रकारांना दिली. त्यांची चौकशी झाली पाहिजे. ही गोपनीय कागदपत्रे होती, तर ती पत्रकारांना देण्याचा नवाब मलिकांना अधिकार होता का, असा सवाल या वेळी फडणवीस यांनी उपस्थित केला.

## पनवेलकरांना ऑनलाइन मालमत्ता उतारा मिळणार विनाशुल्क

पनवेल महानगरपालिकेमार्फत मालमत्ताधारकांना ई-सुविधा देण्याकरिता तसेच नागरिकांच्या वेळेची बचत व्हावी, घरबसल्या आपल्या मालमत्ता करासंबंधित तसेच नोंदणीकृत मालमत्तेबाबत संपूर्ण माहिती देण्याच्या हेतूने 'मनपा आपल्या दारी' हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत आहे. या अंतर्गत 'पीएमसी टॅक्स ॲप' हे मोबाईल ॲप विकसित करण्यात आले आहे. या ॲपच्या माध्यमातून ई-गव्हर्नन्सच्या दृष्टीने पालिकेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. आतापर्यंत चार हजार ५५९ नागरिकांनी हे ॲप डाऊनलोड करून घेतले आहे. या ॲपच्या माध्यमातून आजपर्यंत २४ लाख ४९ हजार ७१५ एवढा मालमत्ता कर भरला आहे. अनेक नागरिकांनी या ॲपमधील विविध सुविधेचा लाभ घेतला आहे तसेच या ॲपबद्दल समाधान व्यक्त केले आहे.

३१ मार्च २०२२पर्यंत मालमत्ता करांवर पाच टक्के सूट देण्यात आली आहे. नागरिकांनी या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त गणेश देशमुख यांनी केले आहे.


### जाहीर हरकत नोटीस

**तमाम जनतेस या जाहीर हरकत नोटीसद्वारे सुचित करण्यात येते की,** आमचे अशिल **१) श्री. मिलिंद भास्कर कोरडे,** रा. – आशापुरा नगर, पंचरत्न हॉटेलजवळ, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड पिन नं. ४१०२०६. आणि **२) श्री. वामन धर्मा भगत, तर्फे कुलअखत्यारी श्री. विजय वामन भगत,** रा. – उसर्ली खुर्द पो.ओ.एन.जी.सी., ता. पनवेल, जि. रायगड पिन नं. ४१०२०६ यांच्या बरोबर **श्रीम. जनाबाई पांडुरंग खुटले** यांनी दिनांक २६/०२/२०१८ रोजी समझोता करार केलेला आहे. त्या जमीन मिळकतीचे सविस्तर वर्णन खालीलप्रमाणे आहे.

**शेतजमीन मिळकतीचे वर्णन**
**मौजे पारगाव डुंगी, ता. पनवेल, जि. रायगड येथील**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार |
|---|---|---|---|
| ४० | ०९ | ०–३१–६ | ४.२८ |

तसेच यांनी दिनांक २६/०२/२०१८ रोजी समझोता करार करून **श्रीम. जनाबाई पांडुरंग खुटले** त्यांचे असलेले सर्व हितसंबंध, हक्क, अधिकार टायटल सहीत आमचे अशिलांना कायमस्वरूपी विक्री केलेले असून सदर व्यवहारामध्ये सदर जमीन मिळकतीमधील हक्क व अधिकार यांचा मोबदला म्हणून फार मोठी रक्कम आमचे अशिलांकडून धनादेश व रोखीने **श्रीम. जनाबाई पांडुरंग खुटले** स्विकारलेली आहे. तसेच आमचे अशिल सदर जमीन मिळकतीचे बोनाफाईड पर्चेसर आहेत.

सदर जमीन मिळकतीचे करीता आमचे अशिलांनी आजवर फार मोठी रक्कम खर्च केलेली असून **श्रीम. जनाबाई पांडुरंग खुटले** यांनी आमचे अशिलांसोबत केलेला व्यवहार व त्या अनुषंगाने आमचे अशिलांचे लाभात दिनांक २६/०२/२०१८ रोजी, अ. नं. ६८१/२०१८ अन्वये नोटरी करून दिलेले **श्रीम. जनाबाई पांडुरंग खुटले** यांचेवर कायदेशीररित्या बंधनकारक आहे.


तसेच उपरोक्त नमूद **श्रीम. जनाबाई पांडुरंग खुटले** यांनी अधिक रकमेचा लोभ झालेला असून आमचे अशिलांचे आर्थिक नुकसान करून फसविण्याच्या घोर हेतूने अन्य त्रयस्थ इसमांसोबत पुन्हा व्यवहार केला असल्याचे समजलेले आहे. सदर व्यवहारास आमचे अशिल **१) श्री. मिलिंद भास्कर कोरडे, २) श्री. वामन धर्मा भगत, तर्फे कुलअखत्यारी श्री. विजय वामन भगत** यांचा तीव्र विरोध व हरकत आहे.

तरी सर्व तमाम जनतेस या सावधान नोटीसीने कळविण्यात येते की **श्रीम. जनाबाई पांडुरंग खुटले** यांच्या सोबत कोणीही कसल्याही प्रकारचा करार, मदार, अखत्यारपत्र, व्यवहार, ठराव करू नये. तसेच सदर जमीन मिळकत कोणीही विकसीत व बांधकाम करून विकसीत करण्याचा कोणीही प्रयत्न करू नये. त्याचप्रमाणे सदर जमीन मिळकतीमध्ये कोणत्याही त्रयस्थ इसमाने हक्क व अधिकार निर्माण करू नयेत. या उपरही कोणीही कसलाही व्यवहार अगर अखत्यापत्र केल्यास आमचे अशिलांचे होणाऱ्या नुकसानीस जबाबदार राहतील व असा कोणताही व्यवहार, करार, मदार, अखत्यारपत्र व इतर आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेनी नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दिनांक :- १२/०३/२०२२**

सही/-
**ॲड. मनोज म्हात्रे**
**पत्ता : पी एल ५ बी – ६/६,**
**सेक्टर नं. १, खांदा कॉलनी,**
**नवीन पनवेल – ४१० २०६**






पनवेल भाजपतर्फे
जनहितार्थ
माहितीसाठी

पनवेल महानगरपालिका हद्दीत
सोमवार, दि. १४ मार्च २०२२ रोजी होणारे
**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**
(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

**कोविशिल्ड**

**सर्व केंद्रांवर पहिला व दुसरा डोस (वयोगट :** १८ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल ■ ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर

**कोव्हॅक्सिन**

- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+)
- ८. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली (१८+ ते १५+)
- ९. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१८+)
- १०. आय.टी.एम. कॉलेज, नवीन पनवेल (१५+ ते १८+)
- ११. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल (१५+ ते १८+)
- १२. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर (१५+ ते १८+)

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पुर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# 'मविआ'ने शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली

## राज्याच्या अर्थसंकल्पावरून माजी राज्यमंत्री रविकांत तुपकर यांची टीका

**पनवेल : वार्ताहर**

राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी नुकताच राज्याचा अर्थसंकल्प सादर केला, परंतु शेतकऱ्यांसाठी त्याच त्याच योजना नाव बदलुन पुन्हा पुन्हा समोर येत असून शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसली आहेत, अशी टीका असे माजी राज्यमंत्री तथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते रविकांत तुपकर यांनी केली. ते पनवेल तालुक्यातील बेलपाडा येथे श्री क्षेत्र वल्डेश्वर मंदिराच्या कलशपूजनाच्या कार्यक्रमच्या वेळी बोलत होते.

तुपकर या वेळी म्हणाले की, हेडलाईन मॅनेजमेंटचा हा सगळा प्रकार असुन पेपरला मोठी बातमी देऊन ऐवढे दिले तेवढे दिले याबद्दल भरभरून सांगायचे, मात्र राज्य सरकारच्या अर्थसंकल्पाचे पाचे किंवा १० वर्षांचे ऑडिट केले तर केलेल्या घोषणा आणि झालेली अंमलबजावणी यामध्ये जमीन आसमानाचा फरक आहे. त्यामुळे घोषणा या फक्त घोषणा राहतात. सामान्य माणसाला याचा काही फायदा होत नाही. हजारो शेतकरी महिन्याला आत्महत्या करत आहेत त्याबद्दल काहीही चर्चा नाही. सामान्य माणसाचे जगणे कसे सुखकर होईल यादृष्टीने या अर्थसंकल्पात फारशी तरतूद केलेली नाही, असे तुपकर यांनी सांगितले.


या वेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष मधुकर कडू, मुख्याध्यापक दत्ता कोळी, नीलम मधुकर कडू, सुजय कडू, मानव कडू आदी उपस्थित होते.

तुपकर पुढे म्हणाले की, महाराष्ट्रात सर्वसामान्य जनतेचे प्रश्न बाजुला राहिले आहेत. शेतकरी–कष्टकरी आत्महत्या करतोय, मजुर आत्महत्या करतोय, शेतकऱ्यांची मुले आत्महत्या करत आहेत.

ग्रामीण भाग उध्वस्त झालाय. सामान्य माणसाला जगणे कठीण झाले आहे. व्यापारी उद्योजक कोरोनाच्या काळात अडचणीत आहेत. या सर्व प्रश्नांवर सत्ताधाऱ्यांमध्ये कुठेच चर्चा होताना दिसत नाही.



पनवेलच्या बेलपाडा येथे मंदिराचे कलशपूजन



सगळ्या प्रस्थापित पक्षांनी चिंतन करावे. अन्यथा पंजाबमध्ये आम आदमी पार्टीचा लोकांनी पर्याय म्हणुन स्वीकार केला. त्याप्रमाणे महाराष्ट्रातील जनता सत्ताधाऱ्यांना बाजूला ठेवून सक्षम पक्षाचा स्वीकारतील. त्यामुळे प्रस्थापितांनी चिंतन करण्याची आवश्यकता आहे, असे मतदेखील तुपकर यांनी व्यक्त केले.

# होळी सणानिमित्त विशेष ट्रेन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

होळी सणानिमित्त मध्य रेल्वे प्रशासनांने प्रवासी संघ, पनवेलच्या लेखी निवेदन व चर्चेद्वारे प्रवासी चाकरमानी कोकणी बांधवांच्या मागणीप्रमाणे विशेष प्रवासी सेवा चालविण्यात येणार आहेत. याची आरक्षण व्यवस्था १० मार्चपासून सर्व संगणक आरक्षण केंद्रावर आणि या संकेतस्थळावर सुरू करण्यात आली आहे. यामुळे नवीन मुंबई, पनवेल शहर व ग्रामीण भाग, रायगड जिल्हा मधील प्रवाशांची गर्दीतून सुटका होऊन प्रवास आरमशीर, आनंदाने, उत्साहाने होळीचा सणा साजरा करण्याचा प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

या रेल्वे सेवांचा चाकरमानी कोकणी प्रवासी बांधवांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे प्रवासी संघाचे अध्यक्ष डॉ. भक्तिकुमार दवे, कार्यवाह व रेल्वे सल्लागार समितीचे सदस्य श्रीकांत बापट, सह सचिव निलेश जोशी, प्रवासी संघातर्फे सर्व चाकरमानी कोंकणी प्रवासी बांधवांना होळी पोर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत.





**■ वेळापत्रक ■**

- **१) ट्रेन नं. १०११/१२** पुणे–करमाळी–पुणे (विशेष सेवा) (४ फेऱ्या)
- **ट्रेन क्र. ०१०११–**११ मार्च आणि १८ मार्च पुणे स्थानकामधून १७:३० सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ८ वाजता करमाळीला पोहचेल.
- **ट्रेन क्र. ०१०१२–**१३ मार्च, २० मार्च रोजी करमाळी स्थानकामधून ९.२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी २३.३५ वाजता पुण्याला पोहचेल.
- **रेल्वेस्थानक थांबे–व्हाया कल्याण–पनवेल–मार्गे** लोणावळा, कल्याण, पनवेल, रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, राजपूर रोड, वैभववाडी रोड, कणकवळी, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवीम.
- **संरचना– (कोच पोझिशन)** १. द्वितीय वातानुकुलीत, ४ तृतीय वातानुकुलीत, ११– शयनयान, ६– द्वितीय आसन
- **२) ट्रेन नं. ०१०१३/१४–** पनवेल–करमाळी–पनवेल (विशेष सेवा) (४ फेऱ्या) **ट्रेन क्र.**
- **०१०१३–** १२ मार्च आणि १९ मार्च रोजी पनवेल स्थानकामधून रात्री २२.०० वाजता सुटेल आणि दुसऱ्या दिवशी ८.०० वाजता करमाळीला पोहचेल.
- **ट्रेन क्र. ०१०१४–** १२ मार्च अणि १९ मार्च रोजी करमाळी स्थानकामधून ९:२० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी पनवेल येथे २०.०० वाजता पोहचेल.
- **रेल्वेस्थानक थांबे** :– रोहा, माणगाव, वीर, खेड, चिपळूण, सावर्डा, संगमेश्वर रोड, रत्नागिरी, आडवली, राजापूर रोड, वैभववाडी रोड, कणकवली, सिंधुदुर्ग, कुडाळ, सावंतवाडी रोड आणि थिवीम.

# वाशिवली आदिवासीवाडीतील गावठी हातभट्टी उद्ध्वस्त

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील वाशिवली आदीवासीवाडीच्या डोंगराळ भागात गैरकायदा गावठी दारुची हातभट्टी असल्याची माहिती रसायनी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलीस निरीक्षक कैलास दादाभाऊ डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली रसायनी पोलिसांनी शिताफीने छापा टाकून गैरकायदा गावठी हातभट्टीचा बेवारस अड्डा उद्ध्वस्त केला आहे.

यात २०० लिटर क्षमतेचे तांबड्या रंगाचे उग्र वास येत असलेल्या रसायनाने भरलेले पाच प्लास्टिकचे ड्रममध्ये व २०० लिटर क्षमतेच्या पाच पत्र्याच्या टाक्या असे एकूण २००० लिटर रसायन मिळून आले. हे रसायन जागीच ओतून नाश करून पाच प्लास्टिकचे ड्रम जाळून नष्ट केले व पाच पत्र्याच्या टाक्या तोडून नुकसान केले आहे. वाशिवली आदिवासी डोंगराळ भागातील गावठी हातभट्टी उद्ध्वस्त करण्याची ही बारावी घटना आहे.

# पनवेलमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीत ३८३ प्रकरणे निकाली

**पनवेल : प्रतिनिधी**

पनवेल जिल्हा न्यायालयात शनिवारी (दि. १२) झालेल्या राष्ट्रीय लोकअदालत मध्ये ३८३ प्रकरणे निकाली निघाली असून १४५९ प्रकरणात पावणे पाच कोटी रुपये तडजोड वसूली झाली.

पनवेल जिल्हा न्यायालायत शनिवारी राष्ट्रीय लोकअदालत भरवण्यात आली होती. तालुका विधी सेवा समिती अध्यक्ष जिल्हा न्यायाधीश आर. जी. अस्मर यांचे हस्ते दीप प्रज्वलन करण्यात आले. या वेळी पनवेल न्यायालयाचे सर्व न्यायाधीश, पनवेल बार असोशिएशनचे अध्यक्ष ॲड. मनोज भुजबळ, ॲड. प्रल्हाद खोपकर इतर वकील व न्यायालयीन कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय लोकअदालत मध्ये जिल्हा न्यायालय, दिवाणी न्यायालय वरीष्ठ स्तर व कनिष्ठ स्तरचे एकूण ११ कक्ष स्थापन करण्यात आले होते. त्यासाठी ११ न्यायाधीश, २२ वकील, ६८ कर्मचारी व चार विधी स्वयंसेवक यांची नेमणूक केली होती. या लोकअदालतमध्ये न्यायालयातील प्रकरणांसोबत तालुक्यातील ग्रामपंचायत कार्यालये, एमएसईबी, एमटीएनएल, राष्ट्रीयकृत बँक व फायनान्स कंपनी कडील




वादपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणा पैकी ३१८३ प्रकरणे तडजोडीसाठी होती. त्यापैकी ३८३ प्रकरणे निकाली निघाली त्यातून तीन कोटी ६६ लाख २४ हजार १४५ रुपये वसूली करण्यात आली. वादपूर्व ४३८२ प्रकरणे होती त्यापैकी १४५९ प्रकरणा मध्ये तडजोड करण्यात आली. त्यामध्ये एक कोटी सात लाख ८७ हजार ६९८ रुपये तडजोडीने वसूल करण्यात आली.

## निवडक



### दुर्गामाता मंदिराचा वर्धापन दिन

**पनवेल :** शहरातील दुर्गामाता मंदिराचा ३७वा वर्धापन दिन शुक्रवारी (दि. ११) साजरा झाला. सालाबादप्रमाणे यंदाच्या वर्षीही दुर्गामाता मंदिरात होम हवन तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमांना अनेक भावीकांनी भेट देत दर्शन घेतले.



### यशवंतराव चव्हाण यांची जयंती

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाच्या वतीने शनिवारी (दि. १२) आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार यशवंतराव चव्हाण यांची जयंती उत्साहात झाली. या निमित्ताने डॉ. संदीप घोडके यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्राचार्य डॉ पी.जी. पवार हे अध्यक्षस्थानी होते. प्रा. चिंतामण धिंदले यांनी प्रास्तविक केले. प्रा. श्रीकांत गोतपागर यांनी उपस्थितांचे आभार मानले. सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. सुजाता पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

### प्रा. महाले यांना गाईडशीप प्रदान

**उरण :** रयत शिक्षण संस्थेच्या वीर वाजेकर



महाविद्यालयातील प्रा. डॉ. विलास महाले यांना मुंबई विद्यापीठाकडून पीएच.डी. मार्गदर्शक म्हणून नुकतीच मान्यता मिळाली आहे. प्रा. डॉ. विलास महाले हे ग्रामीण विकास या विषयाचे विभाग प्रमुख आहेत. डॉ. महाले यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग घेऊन अनेक शोधनिबंध सादर केले आहेत तसेच मुंबई विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण केंद्रासाठी त्यांनी काही पुस्तकांचे लेखनही केले आहे. त्यांच्या संशोधन क्षेत्रातील योगदानामुळे त्यांना नुकतीच मुंबई विद्यापीठाकडून गाईडशीप प्रदान करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्यासह संस्थेचे इतर पदाधिकारी, सदस्य तसेच प्राचार्य डॉ. पी. जे. पवार, प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर आदींनी अभिनंदन केले आहे.

# महिला दिनानिमित्त आयोजित उद्योग आणि खाद्य जत्रेस प्रतिसाद

**पनवेल : वार्ताहर**



महिला दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या उद्योग आणि खाद्य जत्रेमध्ये लागलेल्या ३२ स्टॉलला उदंड प्रतिसाद लाभला. अपेक्षेपेक्षा दुप्पट विक्री झाल्याचे समाधान स्टॉलधारकांनी व्यक्त केले. ब्रॅण्डिंग आपल्या व्यवसायाची आणि बॉण्डींग आपल्या समाजाशी अशी ब्रॅण्डिंग आणि बॉण्डिंग ही महिला दिनाची एम पॉवरने निश्चित केलेली थीम यशस्वी होताना दिसून आली.

दोन दिवस चाललेल्या उद्योग जत्रेची बुधवारी (दि. ९) रात्री १० वाजता सांगता करण्यात आली. भारतीय जनता युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष विक्रांत पाटील, मराठा क्रांती मोर्चा राज्य समन्वयक विनोद साबळे, भाजयुमो कामोठेचे हर्षवर्धन पाटील, ग्लिस्टरचे सचिन गावंड यांच्या हस्ते व निलम आंधळे दिशा फाउंडेशन, राजश्री कदम यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रमाता जिजाऊंच्या प्रतिमेचे पूजन करून आणि फीत कापून कार्यक्रमाचे उद्‍घाटन करण्यात आले.

महिलांमधील कॅन्सर या विषयावर डॉ. प्रांजली अंधारे, डॉ. स्वाती गरड, डॉ. कांचन पाटील वडगावकर, डॉ. आशा डोंगरे, डॉ. अनुजा शेलार यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले व मोफत कॅन्सर तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिरासाठी जीवन ज्योत हॉस्पिटलचे प्रसिद्ध स्त्री रोगतज्ञ डॉ. वैभव अंधारे, तसेच उलवे, सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचे बाल रोग तज्ञ डॉ. अमरदिप गरड यांनी संपूर्ण व्यवस्था उपलब्ध करून दिली. बाय हार्ट पॅथ लॅब करंजाडे डॉ. तानाजी ढेरे व त्यांच्या टीमने मोफत रक्त तपासणीबशिबिराच्या माध्यमातून पाच प्रकारच्या टेस्ट मोफत उपलब्ध करून दिल्या. या शिबिरास महिलांचा मोठ्या प्रमाणात प्रतिसाद लाभला.

ग्लिस्टर, रिद्धी–सिद्धी लॉजिस्टिक, पंढरीनाथ चाय, यांच्या वतीने विशेष सन्मानचिन्ह देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रसिद्धी प्रायोजक म्हणून ग्लिस्टर एलईडी लाइट्स, अश्रिवता फॅमिली रेस्टॉरंट अँड बार, रिद्धी सिद्धी लॉजिस्टिक, बेलोटे चिकन, भक्ती सुगंध सुवासिक अगरबत्ती व पूजा साहित्य मैत्रीण बुटीक, व्ही. एस. ट्रेडर्स मेन्स ॲण्ड किड्स वेअर आणि डोकेज फ्रोजन फूड स्टुडिओ इत्यादी प्रायोजक लाभले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी महिलांच्या टीमने कष्ट घेतले, आणि एमपॉवर टीमच्या पुरुष बांधवांनी सपोर्ट सिस्टिमची भूमिका निभावली.

# युसुफ मेहरअली सेंटरमध्ये महिला मेळावा

**पनवेल : वार्ताहर**



युसुफ मेहरअली सेंटरच्या वतीने शनिवारी (दि. १२) बांधनवाडी येथील मधू प्रमिला दंडवते संकुलात जागतिक महिलादिनाचे औचित्य साधून महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते.

युसुफ मेहर अली सेंटरच्या व्यस्थापन समिती सदस्य ऋता श्रीधर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या मेळाव्यास युसुफ मेहेरअली सेंटरचे संस्थापक ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक डॉ. जी. जी. पारीख, माजी जिल्हा सरकारी वकील ॲड. प्रसाद पाटील, सामाजिक कार्यकर्त्या ॲड. सुरेखा दळवी, उपाध्यक्ष हरीश शहा, प्रकल्प संचालक सुरेश रासम, व्यवस्थापन समिती सदस्य नितीन आनेराव, डॉ. जितूरकर, श्रिया फाउंडेशन पालेच्या संचालिका स्मिता म्हात्रे, आपटा ग्रामपंचायत सरपंच नाजनीन शेख, कर्नाळा ग्रामपंचायत सदस्य दीक्षिता पाटील आदी उपस्थित होते.

युसूफ मेहेरअली सेंटरचे प्रकल्प संचालक सुरेश रासम यांच्या मार्गदर्शनाखाली महिला विभाग प्रमुख मालती म्हात्रे यांनी नियोजनासह सूत्रसंचालन, सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांनी प्रास्ताविक केले, तर बाळकृष्ण सावंत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

या महिला मेळाव्यास परिसरातील शेकडो महिलांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. मेळावा यशस्वी करण्यासाठी संस्थेच्या सर्व महिला कार्यकर्त्यांनी मेहनत घेतल्याबद्दल प्रकल्प संचालकांनी सर्वांचे अभिनंदन केले.

# कामोठे वसाहतीत गुटख्याचा साठा जप्त

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नौपाडा गावामध्ये एका बंद खोलीमध्ये साठवणूक करून ठेवलेल्या गुटख्याच्या दोन गोणी असलेला सुमारे दीड ते दोन लाख रुपये किमतीचा प्रतिबंधित असलेला गुटखा गुन्हे शाखा कक्ष ३च्या पथकाने जप्त केला आहे. यातील चार आरोपींपैकी दोन आरोपींना अटक केली असून दोन आरोपी फरार झाले आहेत. याबाबतचा गुन्हा कामोठे पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आला असल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांनी दिली.



नवी मुंबई पोलीस आयुक्तांनी गुटखा विक्रीबाबत कारवाईची मोहीम घेण्याचे आदेश दिले होते. त्याप्रमाणे कक्ष ३ गुन्हे शाखेकडुन काम सुरू असतांना वरिष्ठ पोलीस निरीक्षक शत्रुघ्न माळी यांना गोपनिय बातमीदारामार्फत कामोठे वसाहतीतील नौपाडा गावामध्ये एका बंद खोलीमध्ये मोठ्या प्रमाणात गुटख्याचा साठा करण्यात आला असून त्याची विक्री होणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार नौपाडा गावातील त्या बंद खोलीच्या भागामध्ये कक्ष ३ गुन्हे शाखेकडुन सापळा रचण्यात आला होता व छापा टाकला.

या वेळी दोन गोणी भरून असलेला सुमारे दीड ते दोन लाच रुपये किमतीचा गुटख्याचा साठा जप्त केला. या वेळी चार आरोपीपैकी दोन आरोपींना अटक केली आहे. तर दोन आरोपी फरार झाले आहे. यांचा शोध पोलीस घेत आहेत. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : १२

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत 'राम प्रहर'च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. देशात या उन्हाळ्यात एका आठवड्याला इतक्या देशांतर्गत विमानांचे उड्डाण होणार आहे.**
*अ.* १० हजारांपेक्षा अधिक *आ.* २५ हजारांपेक्षा अधिक
*इ.* पाच हजारांपेक्षा अधिक *ई.* १५ हजारांपेक्षा अधिक

**२. भारतातील सध्याच्या एकूण विमानतळांची संख्या किती आहे?**
*अ.* ११२ *आ.* १५०
*इ.* ९० *ई.* ५०

**३. महाराष्ट्रातील कोणत्या विमानतळावरून या आठवड्यात विमानसेवा सुरू होणार आहे?**
*अ.* शिर्डी *आ.* सिंधुदुर्ग
*इ.* नाशिक *ई.* गोंदिया





**टीप :** वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील 'ई–स्टोर इंडिया'तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## संपादकीय

# मविआ सरकारची सूडबुद्धी

जनतेला वाऱ्यावर सोडून केवळ सत्ता आणि स्वहितामध्ये मशगूल असलेल्या राज्यातील महाविकास आघाडी सरकारचे नाव 'महाभकास आघाडी सरकार' ठेवायला हवे. या सरकारच्या निष्क्रिय व कुचकामी कारभारामुळे राज्यात अनेक प्रश्न आ वासून उभे आहेत, तर दुसरीकडे मंत्र्यांच्या करामतींमुळे सरकारची नाचक्की झाली आहे. तरी ही मंडळी सुधारायला तयार नाहीत.

**महाराष्ट्राच्या इतिहासात आताइतके बेफिकीर आणि बदनाम सरकार आजवर झालेले नाही. कोरोना, नैसर्गिक आपत्ती, मराठा व ओबीसी आरक्षण, एसटी संप, शेतकऱ्यांच्या व्यथा असे अनेक प्रश्न, समस्या राज्यात असताना तीन पक्षांचे सरकार मात्र कुंभकर्णी झोपेत आहे. झोपलेल्या जागे करता येते, पण झोपेचे सोंग घेतलेल्यांना काय जागे करायचे? राज्य कारभार व्यवस्थित सांभाळता येत नाही, पण दुसरीकडे आपापले 'उद्योग' मात्र सरकारमधील मंडळी चोखपणे करीत आहेत. राज्यात महाविकास आघाडी सरकार स्थापन झाल्यापासून मंत्र्यांचे कारनामे सुरूच आहेत. सर्वांत आधी वनमंत्री व शिवसेना नेते संजय राठोड यांची पूजा चव्हाण या तरुणीच्या संशयास्पद मृत्यूप्रकरणी 'विकेट' पडली. यानंतर खंडणी वसुलीप्रकरणी गृहमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते अनिल देशमुख यांचा नंबर लागला. सध्या ते जेलची हवा खात आहेत. त्यानंतर सरकारमधील आणखी एक मंत्री व राष्ट्रवादीचे नेते नवाब मलिक यांना सक्तवसुली संचालनालयाने अर्थात ईडीने अंडरवर्ल्ड डॉन दाऊद इब्राहिमच्या हस्तकांशी केलेल्या आर्थिक व्यवहारांमुळे अटक केली असून ते कोठडीत आहेत, तर अन्य काही मंत्र्यांवर या ना त्या कारणाने आरोप होत आहेत. अशा प्रकारे महाविकास आघाडी सरकार अडचणीत आल्याचे चित्र आहे. विरोधकांकडून अभ्यासपूर्वक आणि पुराव्यानिशी सत्ताधाऱ्यांची एक एक प्रकरणे बाहेर काढली जात आहेत. माजी मुख्यमंत्री आणि विद्यमान विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांनी तर सरकारला सळो की, पळो करून सोडले आहे. त्यांचा सामना करणे अवघड होत असल्याने त्यांनाच त्रास देण्याचे काम राज्य सरकारकडून सुरू आहे. मुंबई पोलिसांना बजावलेली नोटीस हा त्याचाच एक भाग आहे. वास्तविक फडणवीस यांनी मार्च २०२१मध्ये एक पत्रकार परिषत घेऊन मविआ सरकारचा गृहखात्यातील बदल्यांचा महाघोटाळा बाहेर काढला होता. त्याचे पेनड्राईव्ह, सर्व पुरावे त्यांनी त्याच दिवशी दिल्लीला जाऊन देशाच्या गृह सचिवांकडे सादर केले. या बदल्या घोटाळ्याची चौकशी सीबीआय करतेय. असे असताना झालेला घोटाळा दाबण्यासाठी उलट फडणवीस यांनाच नोटीस बजावण्यात आली. पोलीस बदली घोटाळा उघड झाल्याने फडणवीसांना बीकेसी सायबर पोलीस ठाण्यात हजर राहण्याची नोटीस बजावण्यात आली होती. त्यानंतर फडणवीसांनी आपण स्वत: पोलीस ठाण्यात हजर राहणार असल्याचे म्हटले, मात्र फडणवीस जर पोलीस ठाण्यात हजर झाले तर भाजप कार्यकर्त्यांसह जनतेचा उद्रेक होईल हे ओळखून फडणवीसांच्या घरी जाऊन जबाब नोंदवून घेण्यात आला. हा सर्व प्रकार म्हणजे ठाकरे सरकारकडून होत असलेली सूडबुद्धी आहे. भाजप कार्यकर्त्यांनी पोलीस नोटीसची जाहीर होळी करून त्याचा निषेध केला. आता तरी या सरकारने नसते उद्योग करण्याऐवजी आपल्या कारभारात सुधारणा करणे अपेक्षित आहे. ते राज्यासह राज्यकर्त्यांच्याही भल्याचे ठरेल, हे वेगळे सांगायला नको.**

# निसर्गरम्य माथेरानमध्ये मुद्रांक घोटाळा

**खबरबात**
संतोष पेरणे

माथेरानमध्ये दस्तनोंदणी न करताच ब्रिटिशकालीन बंगल्यांचे खरेदी-विक्री व्यवहार सुरू आहेत. त्या वेळी येथील सर्व जमीन वनखात्याची असल्याने सर्व मालमत्ता या ९९ वर्षांच्या करारावर आहेत. त्यामुळे जमिनीचे हस्तांतरण करण्यासाठी या ठिकाणी आधी जिल्हा प्रशासनकडून परवानगी घ्यावी लागते. त्यानंतर बंगले विकत घेण्याची प्रक्रिया सुरू होते. कोणत्याही ठिकाणी जमिनीचे, भूखंडाचे आणि घरांचे देखील हस्तांतरण हे मुद्रांक शुल्क आणि संबंधित जमिनीचे वर्गीकरण करण्यासाठी सबरजिस्टर कार्यालयात नोंदणी केल्यानंतर जमीन दुसऱ्या व्यक्तीच्या नावे होते. मात्र माथेरानमध्ये १९९० पासून शासन निर्णय धाब्यावर बसवून जमिनीचे हस्तांतरण केले जात असून कोट्यवधींचे मूल्यांकन असलेले बंगले आणि त्याच्या आजूबाजूच्या जमिनी या शासनाला कोणत्याही प्रकारचा महसूल न भरता हस्तांतरीत केल्या जात आहेत.





माथेरानमध्ये ब्रिटिशकालीन बंगले खरेदी-विक्रीचे व्यवहार दस्तनोंदणी न करताच झाले असल्याची गंभीर बाब विधानसभेत तारांकित प्रश्नाच्या माध्यमातून सभागृहासमोर आली. यावर लेखी उत्तरात महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी, अशा प्रकारचा गैरव्यवहार झाल्याचे मान्य केले असून सदर मुद्रांक शुल्क अदा केले आहे की, नाही याची पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत. मुद्रांक न भरता माथेरानमधील मालमत्ता परस्पर हस्तांतरीत केल्या जात असून मुद्रांकमधून सवलत किंवा पळवाटा काढण्याच्या प्रकारावर आता अंकुश येणार आहे. त्यामुळे १९९०पासून धनदांडग्यांकडून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडविण्यात आला आहे. माथेरानमधील लीज होल्ड मालमत्ता या सहजासहजी कोणी विकत घेऊ नये, यासाठी अनेक अटी आणि शर्ती घालण्यात आल्या आहेत. ब्रिटिश काळापासून बनलेले नियम माथेरानचे 'माथेरानपण' वाचविण्यासाठी महत्त्वाचे आहेत. मात्र त्यातून अधिकारी वर्गाने पळवाटा काढल्या आहेत आणि त्यामुळे शासनाचे कोट्यवधींचे नुकसान झाले आहे.

माथेरान येथे ब्रिटिशकाळापासून १७० वर्षांपूर्वीचे ५१२ भूखंड असून त्यावेळी ९९ वर्षांच्या करारावर दिले होते. परंतु, हा ९९ वर्षांचा करार संपल्यानंतर शासनाच्या जाचक अटींमुळे हे भूखंड नूतनीकरण होत नसल्याने यात शासनाचा महसूल बुडत होता. ९९ वर्षांचा करार संपल्यानंतर ५५४ बाजार प्लॉट तसेच ५५८ माथेरान प्लॉट असून सरकारकडून ९९ वर्षांपूर्वी अल्पदरात १२ रुपये भाडे तत्त्वावर दिले होते. आजही त्या भूखंडांसाठी १२ रुपये भाडे आहे. कारण ९९ वर्षांचा करार संपल्यानंतर शासनाच्या जाचक अटींमुळे लीज नूतनीकरण होत नसल्याने शासनाचा महसूल मोठ्या प्रमाणात बुडत आहे. याकडे देखील महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी लक्ष घालून, कोरोना काळात सरकारच्या तिजोरीवर भार पडल्याने लीज नूतनीकरणास शिथिलता दिल्यास सरकारच्या महसुलात मोठ्या प्रमाणात वाढ होईल, तसेच ब्रिटिश कायदे संपुष्टात येतील, असे स्थानिक म्हणणे आहे.

शासनाचा निर्णय जरी स्वागतार्ह असला, तरी काही भूखंडधारक हे मृत झाले असून शासनाच्या जाचक अटींमुळे वारसनोंद हाऊ शकल्या नाहीत. तर ते जिवंत असताना खरेदी विक्रीचा व्यवहार झाला असेल, तर शासन मुद्रांक शुल्क कशाप्रकारे वसूल करणार? हा प्रश्नदेखील गहन आहे. कारण शासनाच्या जाचक अटींमुळे ही वारसनोंद जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार होते. नियमानुसार जन्म आणि मृत्यूची नोंद ही १५ दिवसांच्या आत करणे अनिवार्य असताना शासनाच्या अधिकृत भूखंडाची वारस नोंद लवकर होत नसल्याने आजही मृत व्यक्तीच्या नावे वीजबिल, पाणीबिल, घरपट्टी व इतर शासकीय भूखंडाची रक्कम भरावी लागत आहे. शासनाची लीज नूतनीकरण प्रक्रिया जटील आणि किचकट असून या सर्व प्रक्रियेत मालमत्ता अडकल्या आहेत.

माथेरानमध्ये असे काही भूखंडावर असलेले बंगले हे पडीक असून ते शासनाचा कोणाताही कर भरत नसून यांचे मालक कित्येक वर्षे माथेरानमध्ये फिरकलेच नाहीत. अशा बंगल्याचे सर्वेक्षण करून ते शासन जमा करून गरजूंना लीजवर देण्यात यावे असेसुद्धा स्थानिकांमधून बोलले जात आहे.

राज्य सरकारने महाराष्ट्रातील लीज होल्ड मालमत्ता फ्री होल्ड करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला, परंतु याचा फायदा माथेरान, महाबळेश्वरच्या मालमत्तांना होत नाही. माथेरानचे बाजार प्लॉट आहेत, ते फ्री होल्ड करावे व लीज होल्डची मुदत ३० वर्षांवरून ५० वर्षांपर्यंत करण्यात यावी, अशी स्थानिकांची मागणी आहे. परंतु, संपूर्ण प्रकरणात जिल्हानिबंधक यांनी त्यांच्याकडील दस्त तपासणीसाठी समिती गठीत केली आहे. तर त्या ९१ दस्तप्रकरणी मुद्रांक शुल्क वसुलीची कार्यवाही कधी सुरू होणार आणि माथेरानमधून शासनाचा किती कोटींचा यापूर्वी बुडालेला महसूल वसूल होणार? याबाबत जोरदार चर्चा सुरू झाली आहे.

# डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयात आर्थिक साक्षरता कार्यशाळा

**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील कोलाड येथील तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचलित, डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी महाविद्यालयात शुक्रवारी (दि.११) आर्थिक साक्षरता या विषयावर मार्गदर्शन करण्यात आले.

या वेळी प्रमुख मार्गदर्शक टिपू सुलतान, अनिल देशमुख, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शंकर मुंडे, श्रीमती गीता द. तटकरे तंत्रनिकेतन प्राचार्य विपुल मसाळ, कार्यालय अधीक्षक विजय पाटील आदी उपस्थित होते.

प्रमुख मनोगतामध्ये टिपू सुलतान यांनी, विविध आर्थिक क्षेत्रासंबंधी व शेअर मार्केटचे फायदे अशा अनेक विषयांवर माहिती सांगितली. जोखीम पत्करून विद्यार्थ्यांनी शेअर मार्केटमध्ये उतरून पुढील आयुष्य सुखकर घालावे, असे मत व्यक्त केले.


महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे प्रमुख प्रा. नेहल प्रधान, विज्ञान विभागाचे प्रमुख प्रा. रेश्मा शेळके, कला विभागाचे प्रमुख प्रा. सतीश सावळे, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे प्रमुख प्रा. अमलपुरे सूर्यकांत, सांस्कृतिक विभागाचे प्रमुख प्रा. दिपाली भालेकर, महिला कक्षाचे प्रमुख प्रा. अडलीकर जयंवती, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रा. अनिरुद्ध आर्दीसह विद्यार्थी उपस्थित होते.

# खालापुरात आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती

**खोपोली : प्रतिनिधी**

जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व पुणे येथील राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हाधिकाऱ्यांचे संकल्पनेतून आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण व जनजागृती कार्यक्रम खोपोलीतील नेताजी पालकर सभागृहात पार पडला.

या शिबिरासाठी खालापूरचे तहसीलदार आयुब तांबोळी, पोलीस निरीक्षक अनिल विभुते, गटविकास अधिकारी बालाजी पुरी, नायब तहसीलदार राजश्री जोगी, सर्व शासकीय विभागाचे अधिकारी व कर्मचारी, स्वयंसेवक, गिर्यारोहक, एनसीसी, एनएनएसचे विद्यार्थी उपस्थित होते.



(छाया : विनायक माडपे)

मागील काही वर्षांपासून रायगड जिल्हा अनेक नैसर्गिक अपत्तींना सामोरा गेला आहे. खालापूर तालुक्यातही अनेकदा त्या ठिकाणच्या अज्ञानामुळे पर्यटकांचे अपघात होत असतात. अशा प्रसंगी आपत्ती व्यवस्थापनाचे ज्ञान मोलाची भूमिका बजावून अनेकांचे प्राण वाचवू शकते, असे तहसीलदार तांबोळी यांनी सांगितले. खालापूर तालुक्यात सामाजिक संस्थाच आपत्ती व्यवस्थापन काम उत्कृष्ट असल्याचे पोलीस निरीक्षक अनिल विभुते यांनी मार्गदर्शन करताना सांगितले.

या वेळी पुणे येथील राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाच्या जवानांनी विविध दुर्घटनेत करायची मदत आणि घ्यायची दक्षता याचे प्रात्यक्षिक दाखविले. आपत्कालीन परिस्थितीत जवळ उपलब्ध वस्तूंपासून जीवरक्षक साधने कशी तयार करता येतात, याची शास्त्र शुद्ध माहिती आणि प्रात्यक्षिक उपस्थिताना दाखवण्यात आले.

या प्रशिक्षण शिबिरासाठी रायगड जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण व राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल पुणेचे अधिकारी सुहास थोरात, योगेश साबळे, संतोष जाधव, गणेश महाजन, संतोष शिंदे, योगेश थोरात, रवींद्र यांनी मार्गदर्शन केले.

प्रशिक्षण शिबिराचा फायदा होणार असल्याचे मत अपघातग्रस्त मदत पथकाचे प्रमुख गुरूनाथ साठेलकर आणि एनसीसीच्या शितल गायकवाड यांनी व्यक्त केले.

# कर्जत रेल्वेस्थानकात चेंजिंग रूम उभारावे

## महिला कर्मचाऱ्यांची मागणी

**कर्जत : बातमीदार**

कर्जत रेल्वेस्थानकात स्वतंत्र चेंजिंग रुम नसल्याने महिला कर्मचाऱ्यांची गैरसोय होत असून मध्य रेल्वेवरील नेरळ, शेलू, खोपोली, वांगणी स्थानकात महिलांसाठी चेंजिंग रूम उभारण्याची मागणी होत आहे.

मध्य रेल्वेच्या कर्जत रेल्वे स्थानकासह वांगणी, शेलु, नेरळ, खोपोली या स्थानकांवर महिला कर्मचाऱ्यांना स्वतंत्र चेंजिंग रुम नसल्याने त्यांना स्थानकातील सर्वांसाठी असणाऱ्या प्रतिक्षालयाचा किंवा स्वच्छतागृहाचा वापर करावा लागत आहे. कर्जत रेल्वे स्थानकात एकच चेंजिंग रुम असल्याने एकावेळी एकच कर्मचारी रुमचा वापर करू शकतो. त्यामुळे इतर कर्मचाऱ्यांना काही वेळ बाहेर तिष्ठत उभे राहावे लागत आहे.

महिला कर्मचाऱ्यांना जेवणदेखील रेल्वेस्थानकावर जिथे जागा मिळेल, तिथेच करावे लागत आहे. त्यामुळे कर्जत रेल्वे स्थानकासह वांगणी, शेलू, नेरळ, खोपोली या स्थानकांवर महिला कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र चेंजिंग रुमची व्यवस्था करावी, अशी मागणी कर्जत रेल्वे पॅसेंजर असोसिएशनचे सचिव प्रभाकर गंगावणे यांनी केली आहे.

## आरोग्य प्रहर

# 'हे' मसाले ठरतात आरोग्यासाठी 'सुपरफूड'

अनेकदा आपल्या आजूबाजूला असे अनेक पदार्थ असतात, ज्यांच्या गुणधर्मांची आपणाला माहितीदेखील नसते. आपले शरीर रोगमुक्त ठेवण्यासाठी त्या पदार्थांची आपल्याला मोलाची मदत होत असते. कोरोना काळात आपल्यातील रोगप्रतिकारशक्ती वाढवण्यासाठी आपल्याला अनेक पदार्थांचा आहारात समावेश करण्याचा सल्ला देण्यात येत आहे. त्यातीलच एक होते ते आपल्याच किचनमध्ये सहज उपलब्ध होणारे विविध प्रकारचे मसाले. हे पदार्थ ॲन्टिबॅक्टेरियल गुणधर्मांपासून ते ॲन्टिऑक्सिडंट, कर्करोगविरोधी गुणधर्मांनी परिपूर्ण असल्याचे समजले जाते. या सर्व मसाल्यांचा आपल्या दैनंदिन आहारात योग्य प्रमाणात वापर केला, तर सर्व ६० टक्के आरोग्य समस्या यातूनच दूर होण्यास मदत होते. त्यामुळे या मसाल्यांचा योग्य प्रमाणात वापर आपल्या आहारात करणे केव्हाही लाभदायक...!

**१) तुळस :** तुळस हृदयासाठी खूप फायदेशीर आहे. यामध्ये असलेले ॲन्टिऑक्सिडंट घटक रक्त स्वच्छ करण्याचे काम करतात. तसेच रोगप्रतिकार शक्ती वाढवतात.

**२) काळी मिरी :** आपण जे काही पोषक तत्त्व घेतो, ती पचवण्याच्या आणि शरीरातील घातक तत्त्वे शोषून घेण्याच्या प्रक्रियेत काळी मिरी महत्त्वाची भूमिका बजावते.

**३) लाल मिरची :** चयापचय मजबूत करते आणि रक्ताभिसरण वाढवण्याचे काम लाल मिरची करते.

**४) दालचिनी :** धमन्या आणि नरांमध्ये रक्त परिसंचरण सुधारण्यासाठी कार्य दालचिनीच्या माध्यमातून होत असते. तसेच यातून रोगप्रतिकारशक्ती देखील वाढते.

**५) लवंग :** वातावरणातील विषारी, सूक्ष्मजंतू, जीवाणू आणि बॅक्टेरियापासून शरीराचे संरक्षण करते. याव्यतिरिक्त लवंगमध्ये कर्करोगविरोधी गुणधर्म देखील असतात.

**६) धणे :** रक्तातील साखरेची पातळी कमी करते. शरीर डिटॉक्स करण्यास मदत करते.

**७) जिरे :** रोगप्रतिकारकशक्ती मजबूत करण्याचे काम करते. यामध्ये कर्करोगविरोधी घटक मोठ्या प्रमाणात असतात.

**८) आले :** पचनशक्ती सुधारण्याचे काम करते. हे दाहक-विरोधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. रोगप्रतिकारक शक्ती सुधारण्याचे काम करते.

**९) ओवा :** श्वासातील दुर्गंधी घालवण्याचे काम ओव्याच्या माध्यमातून होते. यामध्ये ॲन्टिऑक्सिडंट घटक भरपूर प्रमाणात असतात. हे शरीरातील ट्यूमर वाढण्यापासून रोखण्याचे काम करते.

**१०) हळद :** हे हृदयासाठी खूप उपयुक्त ठरत असते. कर्करोगविरोधी गुणधर्मांनी समृद्ध आहे.

## पेण येथे उद्या जनजागृती ग्राहक मेळावा

**पेण : प्रतिनिधी**

ग्राहकदिनाचे औचित्य साधून पेण जनजागृती ग्राहक मंचामार्फत मंगळवारी (दि. १५) सायंकाळी ४.३० वाजता गांधी मंदिर वाचनालय या ठिकाणी ग्राहकांच्या तक्रारी समजून घेणे, त्याचे निवारण करणे, कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन करणे तसेच ग्राहकांचे हित, ग्राहकांची जबाबदारी, सुधारित ग्राहक संरक्षण कायदा २०१९ याविषयी माहिती देण्यासाठी या मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.

इच्छुक नागरिकांनी या संधीचा फायदा घ्यावा, असे आवाहन पेण जनजागृती ग्राहक मंचाचे अध्यक्ष चंद्रशेखर मेहेर, उपाध्यक्ष डॉ. अरुण पाटील, राजेंद्र जाधव आणि सचिव डॉ. देविदास बामणे यांनी केले आहे. तसेच पेण जनजागृती ग्राहक मंचामार्फत या वेळी नवीन सभासद नोंदणी मोहीमसुद्धा राबवण्यात येणार आहे.

# मुरुड शहरातील रस्ते तातडीने दुरुस्त करण्याची मागणी

**मुरुड जंजिरा : प्रतिनिधी**

मुरुड शहरातील अंतर्गत रस्त्यांकरीता ५ कोटी निधी मंजूर होऊन चार महिन्यांचा कालावधी उलटला आहे, मात्र अद्यापही रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे सुरु न झाल्याने ही कामे तातडीने सुरु करण्याची मागणी होत आहे.

शहरातील जुनीपेठ, दस्तुरी नाका, अंजुमन हायस्कूल रोड रस्त्यावर खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी पाच कोटींचा निधी उपलब्ध झाला आहे. परंतु, या कामास सुरुवात झालेली नाही. सर. एस. ए. हायस्कूल रस्ताही खड्डेमय झाला आहे. या रस्त्यावरून विद्यार्थी जा-ये करीत असतात. त्यामुळे हा रस्ता प्राधाल्याने व्हावा, अशी मागणी होत आहे. रस्त्यांवर पडलेले खड्डे हे विद्यार्थ्यांसाठी धोकादायक ठरू शकतात. त्यामुळे पावसाळ्यापूर्वी हे सर्व रस्ते चांगल्या दर्जाचे करण्याची मागणी नागरिकांमधून होत आहे.

जुनीपेठ रस्त्यावरील खड्डे हे नेहमीचेच समीकरण बनले आहे. पण हेच खड्डे आता जीवघेणे ठरत आहेत. जुनीपेठसह इतर ठिकाणचे सर्व रस्ते मजबूत चांगल्या दर्जाचे होणे आवश्यक आहे. मात्र नगर परिषदेकडून काम सुरू करण्यास दिरंगाई होत असल्याने नाराजी व्यक्त होत आहे.

**मान्यतेनंतरही कामाला विलंब**

**अंतर्गत रस्त्यांकरीता १६ फेब्रुवारी २०२२ रोजी खुली ई-निविदा प्रसिद्ध करण्यात आली. त्या अनुषंगाने ठेकेदारांनी निविदा भरून ती प्राप्त करण्यात आली आहे. परंतु, प्रत्यक्षात काम सुरू होत नसल्याने नागरिक नाराजी व्यक्त करीत आहेत. या रस्त्याची कामे तांत्रिक मान्यतेसाठी पाठवण्यात आल्याचे नगर परिषदेकडून सांगण्यात येत आहे. परंतु, या गोष्टीलासुद्धा दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधी झाल्याने नागरिक प्रश्न उपस्थित करीत आहेत.**



(छाया : संजय करडे)

निवडक

## राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह उत्साहात



**खोपोली :** ५१ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाच्या समारोपाच्या दिवशी खोपोली येथे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अंकुश खराडे यांच्या नेतृत्वाखाली औद्योगिक सुरक्षा यात्रा काढण्यात आली. त्यानंतर औद्योगिक सुरक्षा कार्यपद्धती व संस्कृती या विषयावर आयोजित विशेष कार्यशाळेत मार्गदर्शक व प्रशिक्षक दत्तात्रेय आंबुलकर यांनी मार्गदर्शन केले. खोपोलीचे औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अंकुश खराडे यांनी, औद्योगिक क्षेत्रात संपूर्ण सुरक्षेसाठी प्रशासन व कामगार व्यवस्थापनाने सर्व स्तरावरून प्रयत्न होण्याची गरज असल्याचे सांगितले. या कार्यशाळेसाठी ए. ए. के कमानी कंपनीचे महाव्यवस्थापक गणेश डोईफोडे, सहव्यवस्थापक गोविंद ढाकणे, महाड औद्योगिक सुरक्षा व आरोग्य उपसंचालक अजित मोहिते, कपलीजेन फार्मा कंपनीचे सुरक्षा व्यवस्थापक खोत, कर्मचारी उपस्थित होते.

## रिझर्व्ह बँकेतर्फे आज उद्योजकांसाठी बैठक

**अलिबाग :** जिल्ह्यामधील सूक्ष्म, लघु व मध्यम (एमएसएमई) उद्योजकांसाठी भारतीय रिझर्व बँक (मुंबई) वित्तीय समावेश आणि विकास विभागातर्फे आज सोमवारी (दि. १४) सकाळी १० वाजता हॉटेल सिसॉम, पेण बायपास येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय रिझर्व्ह बँक वित्तीय समावेश आणि विकास विभाग, तहसीलदार, आरसेटी, जिल्हा उद्योग केंद्र, बँकांचे अधिकारी उद्योजकांना मार्गदर्शन करणार आहेत. बैठकीत उद्योजकांना आपल्या सूचना, समस्या बँक अधिकाऱ्यांसमोर मांडून सोडवून घेता येणार आहे. ही बैठक रायगड जिल्ह्यात प्रथमच होत असल्याने सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योजकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन भारतीय रिझर्व्ह बँकेच्या जनरल मॅनेजर कल्पना मोरे यांनी केले आहे.

## ‘उडाण’मध्ये पालीवाला महाविद्यालयाचे यश

**पाली :** मुंबई विद्यापीठाच्या आजीवन अध्यापन व विस्तार कार्य विभागातर्फे घेण्यात आलेल्या उडाण महोत्सवात पाली येथील शेठ ज. नौ. पालीवाला महाविद्यालयाने घवघवीत यश संपादन केले आहे. भित्तीपत्रक स्पर्धेमध्ये मोहन पारधी याला तृतीय क्रमांक तर हर्बल पाटील दिग्दर्शित शॉर्टफिल्मला द्वितीय क्रमांक मिळाला. या शॉर्टफिल्ममध्ये प्रथमेश देशमुख, किर्ती राधाकृष्णन, साक्षी पोंगडे, श्रुती राऊत, राज खांडेकर, राजकुमार गायकवाड, आदित्य काटकर यांनी काम केले आहे. त्यांना साक्षी बैकर, पांडुरंग पारधी यांनी सहकार्य केले.

# कोविडमधील विकासकामांची पोकळी भरून काढणार

## आमदार रविशेठ पाटील यांची ग्वाही; पेणमध्ये कोट्यवधींच्या विकासकामांचा शुभारंभ





**पेण : प्रतिनिधी**

पेण विधानसभा मतदारसंघाचे आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते आपल्या माध्यमातून मंजूर केलेल्या कोट्यावधींच्या विकासकामांचा शुभारंभ करण्यात आला. या वेळी बोलताना आमदार रविशेठ पाटील यांनी, मागील दोन ते अडीच वर्षे कोरोना काळात विकासकामे करता आली नव्हती. मात्र आता कोरोनाची लाट ओसरली असल्याने मी माझ्या मतदारसंघातील प्रत्येक गावात विकासकामे करून ही पोकळी भरून काढणार आहे, असे सांगितले.

या वेळी डॉ. अनंत पाटील, भाजप जिल्हा उपाध्यक्ष वैकुंठ पाटील, तालुकाध्यक्ष श्रीकांत पाटील, पंचायत समितीचे माजी उपसभापती नाशिकेत पाटील, माजी सरपंच सूर्यहास पाटील, हमरापूर विभागप्रमुख भरत पाटील आदी उपस्थित होते.

तालुक्यातील दादर, सोनखार, उरणोली, कळवे, तांबडशेत, हमरापूर, खारसापोली, वरेडी, कोपर, जोहे या भागांमधील अंतर्गत रस्ते, उरणोली गावातील प्रवासी जेट्टी येथे दशक्रिया विधीसाठी निवाराशेड, छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे सुशोभिकरण, खाडी रस्ते, स्मशानभूमी रस्ते, विसर्जन घाट, रस्ते डांबरीकरण, कळवे येथील विठ्ठल रखुमाई मंदिर सभामंडप आदी कामांसाठी आमदार रविशेठ पाटील यांनी कोट्यवधींचा निधी मंजूर केला.

या वेळी रविशेठ पाटील यांनी, दहा वर्षांपूर्वी आपण मंत्री असतानाच्या काळातील विकासकामांची आठवण करून दिली. मात्र सध्या या मतदारसंघाचा विकासच खुंटला होता. सत्ता नसताना देखील विविध माध्यमातून आपण प्रत्येक गावात विकासकामे करत आहोत आणि यापुढे देखील करत राहणार असून राजकारण बाजूला सर्वांनी एकत्र येऊन गावाचा विकास करा, असे आवाहन त्यांनी केले.

> **मागील दीड महिन्यात आमदार रविशेठ पाटील यांच्या माध्यमातून जवळपास पाच कोटी रुपयांची विकासकामे झाली आहेत. मात्र इतर पक्षांनी या काळात किती कामे केली, हे जाहीर करावे. नुकत्याच झालेल्या पाच राज्यांच्या निवडणुकीत भाजपला भरघोस यश प्राप्त झाले असून देशात भाजपचीच लाट आहे आणि देशाचा विकास भाजपच करू शकतो.**
>
> **–वैकुंठ पाटील, रायगड जिल्हा उपाध्यक्ष, भाजप**

# आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्यूची चौकशी करा

## पेण प्रकल्प कार्यालयात आदिवासींचे ठिय्या आंदोलन



**कर्जत : बातमीदार**

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील सानेगाव येथील शासकीय आश्रमशाळेत १२ वी मधील विद्यार्थ्याने शाळेत आत्महत्या केली होती. त्या विद्यार्थ्याच्या मृत्यूचे कारण स्पष्ट होण्यासाठी शासनाने चौकशी समिती गठीत करावी, यासाठी राष्ट्रीय आदिवासी एकता परिषदेने शनिवारी (दि. १२)पेण प्रकल्प कार्यालयावर आंदोलन केले.

सानेगाव येथील शासकीय आश्रमशाळेत शिकत असलेल्या प्रवेश बांगारे या बारावीतील विद्यार्थ्याने परीक्षा सुरू होण्याच्या एक दिवस आधी आत्महत्या केली. आपला मुलगा अभ्यासात हुशार होता आणि तो आत्महत्या करू शकत नाही, अशी भूमिका त्याच्या पालकांनी घेतली आहे. मात्र परीक्षेचे टेन्शन घेतल्याने त्याने आत्महत्या केली, अशी माहिती आदिवासी विकास विभागाने दिली होती. या आत्महत्येबाबत गुन्हा दाखल होऊन कोणतीही चौकशी पोलिसांकडून केली जात नाही. यामुळे आदिवासी राष्ट्रीय एकता परिषदेकडून प्रवेश बांगारेच्या मृत्यूची चौकशी करण्याची मागणी सातत्याने केली जात आहे. या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी यापूर्वी आदिवासी विकास विभागाचे उपआयुक्तांकडे दाद मागितली होती. मात्र याबाबत आदिवासी विकास विभाग आणि पोलिसांकडून कोणतीही माहिती देण्यात आलली नाही. त्यामुळे आदिवासी राष्ट्रीय एकता परिषदेने पेण प्रकल्प कार्यालयाबाहेर धरणे आंदोलन केले.

त्या वेळी परिषदेचे रायगड जिल्हाध्यक्ष लक्ष्मण निर्गुडा, संघटनेचे पदाधिकारी पेण तालुकाध्यक्ष कृष्णा खाकर यांच्यासह मृत विद्यार्थ्याचे पालक व आदिवासी बांधव उपस्थित होते.

> **उच्चस्तरीय चौकशीसाठी पाठपुरावा करणार**
>
> **पेण येथील आदिवासी विकास विभागाचा सल्लागार समितीचे अशासकीय सदस्य कांता पादिर यांनी, धरणे आंदोलन करणाऱ्या कार्यकर्त्यांची भेट घेतली. त्या वेळी पोलिसांनी या प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी आम्ही सर्व उचलून धरू, असे आश्वासन पादिर यांनी दिले आहे.**

# माणगावातील गुरेचोर अटकेत

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील भाले येथील सागर खानविलकर यांची गुरे चोरणाऱ्याला माणगाव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

फिर्यादींच्या म्हशीला काही अज्ञात चोरट्यांनी चोरून नेण्याचा प्रयत्न केला होता. फिर्यादी यांनी त्यांच्या सहकाऱ्यांच्या मदतीने शोध घेतला. मात्र रात्रीचा फायदा घेऊन आरोपी हे घटनास्थळावर त्यांच्या ताब्यातील होंडा सिटी गाडी सोडून पळून गेले होते. ५ फेब्रुवारी २०२२ रोजी रात्री फिर्यादी सागर खानविलकर यांच्या घरासमोरून अज्ञात चोरट्यांनी त्यांची गुरे चोरल्याची तक्रार त्यांनी माणगाव पोलीस ठाण्यात दिली होती. तपासादरम्यान अली मुद्दी शेख (वय ३२) रा. कुरमुरा भट्टी, मुंब्रा हा आपल्या चार साथीदारांसह फरार झाल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. अधिक तपासानंतर हा आरोपी १२ मार्च रोजी त्याच्या राहते घरी येणार असल्याची महिती पोलिसांना लागली होती. माणगाव पोलिसांच्या पथकाने त्वरीत मुंब्रा येथे जाऊन ताब्यात घेतले असून त्याने गुन्हा कबुल केला आहे. आरोपी अली मुद्दी शेख याच्यावर नेरळ व माणगाव पोलीस ठाण्यात यापूर्वीही गुन्हे दखल आहेत. या घटनेचा अधिक तपास माणगाव पोलीस करीत आहेत.

# राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये ३० हजार २८८ प्रकरणे निकाली

## १४ कोटी ९९ लाख ९१ हजारांची तडजोड रक्कम वसूल

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यात शनिवारी (दि. १२) झालेल्या लोकन्यायालयात वादपूर्व व दाखल अशी एकूण ३० हजार २८८ प्रकरणे सामंजस्याने मिटविण्यात यश आले आहे.

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय दिल्ली यांच्या निर्देशांप्रमाणे संपूर्ण भारतभर राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले होते. त्यामध्ये न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे तसेच न्यायालयात दाखल होण्यापूर्वीची प्रकरणे ठेवण्यात आली होती.

रायगड जिल्ह्याच्या प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश विभा प्र. इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्यामध्ये आयोजित केलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये दाखलपूर्व व प्रलंबित अशी एकूण ८८ हजार ७६७ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी दाखलपूर्व २९ हजार ३७७ व प्रलंबित प्रकरणांपैकी ९११ प्रकरणे अशी एकूण ३० हजार २८८ प्रकरणे सामंजस्याने मिटवून लोकअदालतीमध्ये निकाली निघाली आहेत. त्याद्वारे पक्षकारांना एकूण १४ कोटी ९९ लाख ९१ हजार ६०९ रूपयांची तडजोड रक्कम मिळवून देण्यात यश आले आहे.

रायगड जिल्ह्यातील विविध न्यायालयात ४० लोकअदालतीचे कक्ष स्थापन करण्यात आले होते. लोकअदालतीमध्ये पक्षकारांना न्यायालयात येण्याची सक्ती न करता व्हिडीओ कॉलद्वारेही काही प्रकरणे मिटवण्यात आली.

### १० जोडप्यांचा संसार पुन्हा जुळला

***पेण येथील लोकन्यायालयात तीन जोडपी, महाड येथील लोकन्यायालयात तीन जोडपी, उरण येथील लोकन्यायालयात दोन जोडपी, खालापूर व रोहा येथे प्रत्येकी एक जोडपे यांच्यातील वाद सामंजस्याने मिटल्यामुळे त्यांनी त्यांच्या वैवाहिक आयुष्याला पुन्हा नव्याने सुरुवात केली. त्या पक्षाकारांचा पॅनलवरील न्यायधीशांनी पुष्प देऊन सत्कार केला.***

# विरोधी पक्षनेते फडणवीस यांच्या पुढाकाराने चिमुकल्यांना जीवदान



**कर्जत : बातमीदार, प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील चौक येथील दोन मुलींच्या शस्त्रक्रियेसाठी माजी मुख्यमंत्री व सध्याचे विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने त्यांना आर्थिक मदत मिळणार आहे. त्यामुळे या चिमुकल्यांच्या पालकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

खालापूर तालुक्यातील चौक येथील अमित जाधव यांच्या चिमुकल्या स्वरांजली आणि स्वराली यांना बोन मॅरो ट्रान्सप्लांटच्या शस्त्रक्रियेसाठी ३७ लाखांची आवश्यकता आहे. एवढी मोठी रक्कम उभी करणे त्यांच्या कुटुंबासाठी कठीण असल्याने कर्जत येथील कार्यक्रर्ते दिगंबर चंदने यांनी राज्याच्या मुख्यमंत्री सहाय्यता निधीचे कामकाज पाहणारे ओमप्रकाश शेट्टे यांच्याकडे ही अडचण मांडली. त्यांनी ही बाब माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कानावर घातली.

फडणवीस यांच्या कार्यालयाकडून चंदने यांना संपर्क करून त्या दोन्ही मुलींना शस्त्रक्रियेसाठी मुंबईतील संबंधित रुग्णालयात दाखल करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत तसेच ओमप्रकाश शेट्टे यांनी आपण मुंबई भेटीत त्या मुलींची भेट घेणार असल्याचे आश्वासनही दिले आहे.

(छाया : जयवंत माडपे)



**खोपोली : माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांना मुंबई पोलिसांकडून बजावण्यात आलेल्या नोटीससंदर्भात खोपोली भाजपने निषेध व्यक्त करीत प्रतिकात्मक नोटीसचे शहर मध्यवर्ती कार्यालयासमोर दहन केले व राज्य सरकारविरोधात घोषणा दिल्या. या वेळी शहराध्यक्ष इंदरमल खंडेलवाल, सरचिटणीस हेमंत नांदे, प्रमोद पिंगळे, कामगार सेलचे सूरकांत देशमुख, शहर उपाध्यक्ष रमेश रेटरेकर, चिटणीस गोपाळ बावस्कर, माजी शहर अध्यक्ष विजय तेंडुलकर, किसान मोर्चाचे सुधाकर दळवी, युवामोर्चाचे अजय इंगुळकर, महिला आघाडीच्या अश्विनी अत्रे, विकास नाईक व इतर कार्यकर्ते उपस्थित होते.**


MAHAGENCO
Maharashtra State Power Generation Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

**Tender Specification No.** CE(C)-III/GTPS URAN/Rfx. No. 3000026534 & 3000026536/ 2021-22.

**Name of work:-** Work of structural repair, Renovation at GTPS, Uran.

**Sale Date:-** 14.03.2022 at 11:00 Hrs to 23.03.2022 upto 15:00 Hrs. | **Date of Submission:-** 24.03.2022 upto 15:00 Hrs.

**Contact person-** Superintending Engineer (C), O/o Chief Engineer (Civil) -III, M.S.P.G. Co. Ltd., Mumbai. **Fax:**(022)26581469 **Tel.No.**022-26474211 extn. 2590, 26472131, E-MAIL ID :- cgmcivil3@mahagenco.in

**For further details visit our Website** https://eprocurement.mahagenco.in

**Agencies are requested to register themselves for this and future E-Tenders**


# अवकाळी पावसाचा पक्ष्यांनाही फटका

## पर्यावरण आणि निसर्ग अभ्यासकांनी व्यक्त केली चिंता

**पाली : प्रतिनिधी**

पाली-सुधागडसह रायगड जिल्ह्यात फळे, फुले व पक्षांचा हंगाम ऐन बहरात आहे. मात्र दोन दिवसांपूर्वी सुधागड, पोलादपूर, महाड, माणगाव आदी ठिकठिकाणी पडलेल्या अवकाळी पावसाचा फटका येथील फळे, फुले व पक्षांनाही बसला आहे. परिणामी पक्षांची खाद्यासाठी परवड होतांना दिसत असल्याचे निरीक्षण येथील पक्षी व निसर्ग अभ्यासकांनी नोंदविले आहे.



(छाया: धम्मशील सावंत)

सध्या काजू, आंबा, फणस, करवंद, जांभूळ, कण्हेर अशा विविध झाडांच्या मोहोराचा बहर असल्याने अवकाळी पावसामुळे या झाडांचा मोहोर गळून जातो. केवळ झाडांनाच नाही, तर कीटक व पक्षांना देखील याचा फटका बसला आहे. फेब्रुवारी ते मे हा शिकारी पक्षांच्या विणीचा हंगाम असल्याने त्यांची घरटी उंच झाडावर बनवलेली असतात. या अवकाळी पाऊस व सोसाट्याचा वाऱ्याने पक्षांची घरटी मोडली असल्याची भीती पक्षी प्रेमींनी व्यक्त केली. पाटणूस येथील निसर्ग व पक्षी अभ्यासक राम मुंढे यांनी सांगितले की, काही पक्षांच्या घरट्यात पाणी शिरल्याने घरट्यांच्या काड्या कमकुवत झाल्या आहेत. पर्यायाने पक्षांना घरटी सोडावी लागतात.

राज्यपक्षी हरियाल, पाचू कवडा, टोई पोपट, पोपट, भारद्वाज, कावळा, कोकिळा या पक्षांची झाडाच्या फांदीला आणि झाडाच्या ढोलीत बीळ तयार करून बनवलेली घरटी असतात. अवकाळी पावसामुळे घरट्यात पाणी शिरल्याने यामुळे त्यांची फरपट होत आहे.

### अन्नासाठी करावी लागतेय धडपड

**अवकाळी पावसामुळे कीटकांची संख्या कमी झाल्याने या पक्ष्यांवर उपासमारीचे संकट उभे राहते. ढगाळ हवामानाचा परिणाम झाल्याने कीटकांची संख्या रोडावते. फेब्रुवारी ते एप्रिल दरम्यान काही फुलांचा बहर असतो. विविध फुलांतील मकरंद शोषण्यासाठी कीटक व पक्षी या झाडांवर दिसतात. मात्र अवकाळी पावसाने फुलांमध्ये पाणी गेल्याने त्याचप्रमाणे सोसाट्याच्या वाऱ्यामुळे फुले गळून पडल्याने या कीटक व पक्षांवर उपासमारीचे संकट उभे राहिले आहे.**

### घरटी बांधण्यासाठी साहित्य मिळेना

**थंडीच्या दिवसात जंगलात तयार केलेल्या कोळ्यांची जाळी ही मे किंवा जूनमध्ये काही पक्षांना आपली घरटी बांधण्यासाठी व मजबुतीसाठी महत्त्वाची असतात. त्याचबरोबर त्या जाळींमध्ये असणारी कोळ्यांची अंडी किंवा कोळ्यांची छोटी पिल्ले ही पक्ष्यांचे खाद्य असतात. परंतु, अवकाळी पावसाच्या फटक्याने या कोळ्यांच्या जाळ्यांची वाताहात झालेली दिसत आहे. परिणामी घरटी बांधण्यासाठी पक्ष्यांना साहित्य मिळेनासे झाले आहे.**


MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E–TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification. Tender fees Rs.500/- + GST**

| Sr. No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No: - 7000022456** **Tender No. : EE/EHV (O&M)/DN/PNL/e-Tender-1/2022-2023.** RFx E-tender for work of providing of service for housekeeping, cleaning, sweeping and Garden Maintenance and cleaning of overhead Tanks work at various Substation and offices under EHV (O&M) Division, Panvel for FY 2022-2023. **Tender amount Rs.20, 92,859/- EMD amount Rs. 20,929/-.** |
| 2 | Online Downloading the RFx . | **14.03.2022, 17:00 Hrs. to 21.03.2022, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 21.03.2022 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **22.03.2022 at 11.00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**

**Contact Person :-** The ADDL. Executive Engineer, (O) : Phone No. 022- 2746 5410.

**Note :** All eligible Suppliers / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**(M.C.JOSHI)**
**EXECUTIVE ENGINEER**
**EHV(O&M) DN PANVEL**

# कसोटीत पंतचे जलद अर्धशतक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

श्रीलंकेविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऋषभ पंतने अर्धशतक ठोकले आहे. कसोटी क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वात जलद अर्धशतक करण्याचा विक्रम पंतने केला आहे. त्याने भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार कपिल देव यांचा विक्रम मोडला आहे. पंतने अवघ्या २८ चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले.

बंगळुरू येथील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळल्या जात असलेल्या भारत आणि श्रीलंका यांच्यातील दुसऱ्या कसोटी सामन्यात ऋषभ पंतने अवघ्या २८ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले. या खेळीदरम्यान पंतने सात चौकार आणि दोन षटकार मारले.

त्यामुळे आता भारतातर्फे वेगवान अर्धशतक करणाऱ्यांच्या यादीत भारताचे माजी कर्णधार कपिल देव यांचे नाव दुसऱ्या क्रमांकावर आले आहे. कपिल देव यांनी १९८२ मध्ये कराचीमध्ये पाकिस्तानविरुद्ध ३० चेंडूंत अर्धशतक ठोकले होते, तर शार्दुल ठाकूरने २०२१मध्ये ओव्हल येथे इंग्लंडविरुद्ध ३१ चेंडूंत अर्धशतक केले होते. चौथ्या क्रमांकावर भारताचा माजी सलामीवीर वीरेंद्र सेहवाग आहे, ज्याने २००८मध्ये चेन्नई येथे इंग्लंडविरुद्ध ३२ चेंडूंत अर्धशतक ठोकले होते.



आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वांत कमी चेंडूंत अर्धशतक करण्याचा विक्रम पाकिस्तानचा माजी कर्णधार मिसबाह-उल-हकच्या नावावर आहे. ज्याने २०१४मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध २१ चेंडूंत हे स्थान मिळवले होते, तर भारतीय मैदानावर सर्वांत जलद अर्धशतक करण्याचा विक्रम शाहिद आफ्रिदीच्या नावावर आहे. आफ्रिदीने २००५मध्ये बंगळुरूमध्ये भारताविरुद्ध २६ चेंडूंत अर्धशतक पूर्ण केले होते. इयान बोथमने १९८१मध्ये भारताविरुद्ध २८ चेंडूंत अर्धशतक केले होते. या यादीत ते दुसऱ्या क्रमांकावर आहेत.

दरम्यान, पंतला आपला डाव जास्त पुढे नेता आला नाही. ३० चेंडूंत ५० धावा करून तो बाद झाला. त्या वेळी भारताची धावसंख्या पाच गडी बाद १८४ अशी होती. पंतने १५६.१४च्या स्ट्राइक रेटने धावा केल्या.

# राज्यस्तरीय कराटे स्पर्धेत कर्जतमधील खेळाडूंचे सुयश

**कर्जत : बातमीदार**

आठव्या रेन्बो कप कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेमध्ये कर्जतच्या कराटेपटूंनी घवघवीत यश संपादन केले आहे. या स्पर्धेत राज्याच्या वेगवेगळ्या भागातून एकूण ५३० स्पर्धक काता, कुमिते (फाईट) आणि वेपन्स प्रकारात सहभागी झाले होते.

स्पर्धेतील काता प्रकारामध्ये कर्जतमधील भूषण बडेकर, आशुतोष ताम्हाणे, ध्रुव परदेसी, ऋतुजा मरले, आयुश देशमुख, तन्वी बडेकर, कबीर वारंगे या खेळाडूंनी यांनी सुवर्ण, धीरज कांबळे, सुरज दातिर, आरोही देशमुख यांनी रौप्य, आणि पायल भोसले या खेळाडूने कांस्यपदक पटकाविले. कुमिते (फाईट) या प्रकारात कबीर वारंगेने सुवर्णपदकाची कमाई केली. या राज्यस्तरीय स्पर्धेत कर्जत तालुक्यातील खेळाडूंनी एकूण १२ पदकांची कमाई केली. यामध्ये आठ सुवर्ण, तीन रौप्य आणि एक कांस्यपदकाचा समावेश आहे. पदक विजेते खेळाडू हे रेन्बो बुडोकॉन कराटे अकॅडमीमध्ये वसंत शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्रशिक्षक नरेश बडेकर, विशाल गायकवाड यांच्याकडून कराटेमधील डावपेच शिकत आहेत.



# हॅट्ट्रिकसह रोनाल्डोचा विश्वविक्रम

## सर्वाधिक गोल करणारा खेळाडू बनला

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

पोर्तुगालचा दिग्गज फुटबॉलपटू ख्रिस्तियानो रोनाल्डो सर्वाधिक गोल करणारा फुटबॉलपटू बनला आहे. आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम आता रोनाल्डोच्या नावावर जमा झाला आहे. रोनाल्डने आतापर्यंत एकूण ८०६ गोल केले आहेत. महान फुटबॉलपटू जोसेफ बाइकनचा फुटबॉल इतिहासात सर्वाधिक गोल करण्याचा विक्रम रोनाल्डोने मोडला. रोनाल्डोने आपल्या ८०६ व्या गोलसह हा विक्रम मोडला.



रोनाल्डोने गेल्या वर्षी जानेवारीत पेले यांचा विक्रम मोडित काढला होता. त्या वेळी पेलेंच्या अधिकृत खात्यावर ७५७ गोल दिसत होते. रोनाल्डोने पेलेंना मागे टाकताच त्यामध्ये बदल झाले. त्यांची गोल संख्या ७६७ झाली. या कामगिरीबद्दल ब्राझीलचे स्टार फुटबॉलपटू पेले यांनी रोनाल्डोचे अभिनंदन केले होते.

दरम्यान, रोनाल्डोची क्लब कारकिर्दीतील ही ४९वी हॅट्ट्रिक होती. प्रीमियर लीगच्या इतिहासात हॅट्ट्रिक करणारा रोनाल्डो हा दुसरा सर्वात वयस्कर खेळाडू ठरला. जेथे टेडी शेरिंगहॅमने ऑगस्ट २००३ मध्ये वयाच्या ३७ वर्षे आणि १४६ दिवसांत हॅट्ट्रिक केली होती.

रोनाल्डो हा आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये सर्वाधिक गोल करणारा खेळाडू आहे. त्याने गेल्या वर्षी इराणच्या अली दारला हरवून हा विक्रम केला होता. अलीने १०९ गोल केले होते. आतापर्यंत रोनाल्डोने पोर्तुगालसाठी ११५ गोल केले आहेत.

# स्टर्लिंग कॉलेजमध्ये वार्षिक क्रीडा स्पर्धा

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ येथील एनसीआरडी स्टर्लिंग इनन्स्टिटट्युट ऑफ फार्मसीचा वार्षिक क्रीडा दिन नुकताच झाला. यामध्ये मुला-मुलींसाठी धावणे, किकेट, व्हॉलीबॉल, थ्रोबॉल, कॅरम व टॅबल टेनिस अशा खेळांच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या.

या वेळी संस्थेचे मुख्य प्रशासकिय अधिकारी अमरजित खराडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेश पिंगळे, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नियोजन प्रा. दीपक पोखरकर यांनी केले होते. कोविडमुळे सर्वच क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम बंद असल्याने व कॉलेजदेखील बंद असल्याने विद्यार्थी दीड वर्ष ऑनलाइन शिक्षण घेत होते. कॉलेज सुरू झाल्यानंतर क्रीडा व सांस्कृतिक कार्यक्रम होत असून त्यास विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभत आहे.



# जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मिस्तु केम प्लास्ट लि. कंपनी खोपोली आणि नवी मुंबई स्पोर्ट्स व सामाजिक विकास मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवी मुंबई व रायगड जिल्हा अजिंक्यपद टेबल टेनिस स्पर्धेचे आयोजन २६ व २७ मार्च रोजी नवीन पनवेल सेक्टर १८ येथील सिडको समाजमंदिरात करण्यात आले आहे.

शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार विजेते व रायगड जिल्हा टेबल टेनिस असोसिएशनचे अध्यक्ष संजय कडू यांच्या मार्गदर्शनाखाली होणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन मिस्तु केम प्लास्ट लि.चे मॅनेजिंग डायरेक्टर संजय डेढीया यांच्या हस्ते २६ मार्च रोजी सकाळी ९ वाजता होईल.

स्पर्धा नवोदित (बिगिनर्स) मुली व मुले, ११ वर्षांखालील मुली व मुले आणि १३ वर्षाखालील मुली व मुले अशा तीन गटांत घेण्यात येणार आहे.




**पनवेल : महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस राज्यातील एक एक घोटाळे बाहेर काढत असल्याने महाविकास आघाडी सरकारने गुन्हेगारांवर कारवाई करणे अपेक्षित असताना उलट फडणवीस यांनाच राज्य सरकारने पोलिसांमार्फत नोटीस पाठवली. हा सर्व प्रकार बघता महाराष्ट्रातील जनता संतापली असून या नोटीसची रविवारी खांदा कॉलनी येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली होळी करून महाविकास आघाडी सरकारचा निषेध करण्यात आला.**



**पनवेल : श्री गणेश क्रिकेट संघाच्या वतीने भोकरपाडा येथे आमदार चषक क्रिकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला आमदार महेश बालदी यांनी रविवारी भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी भाजप पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष प्रवीण खंडागळे, माजी पंचायत समिती सभापती देविदास पाटील, सरपंच निलेश बाबरे, गुळसुंदे विभागीय अध्यक्ष अविनाश गाताडे, खानावळे ग्रामपंचायत सदस्य गणेश आगिवले, महेंद्र पाटील, आयोजक सचिन दुर्गे, प्रवीण ठाकूर, सुनील दळवी यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.**

**पनवेल : भाजप युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष तथा नगरसेवक विक्रांत पाटील यांच्या वतीने पनवेल महापालिकेच्या छत्रपती संभाजी महाराज मैदानात प्रदेश अध्यक्ष चषक क्रिकेट स्पर्धा रविवारी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर यांनी भेट दिली. त्यांचे स्वागत करण्यात आले. या वेळी देविदास खेडकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि क्रिकेटप्रेमी उपस्थित होते.**










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. —मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com